संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक
mandeshexpressatp@gmail.com

दैनिक माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे
मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com

वर्ष : ६ वे ● ● अंक : ११८ ● ● रविवार दि. १७ मार्च २०२४ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021




# सांगली लोकसभेसाठी 'सात मे' ला मतदान 'चार जून' ला मतमोजणी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली/प्रतिनिधी : भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ चा कार्यक्रम काल दि. १६ मार्च २०२४ रोजी जाहीर केला आहे. या कार्यक्रमानुसार सांगली जिल्ह्यात तिसऱ्या टप्प्यात दि. ७ मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच संपूर्ण देशात १६ मार्च २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली असून निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत आदर्श आचारसंहिता लागू राहील. आदर्श आचारसंहितेची जिल्ह्यात काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यास जिल्हा प्रशासनाचे सर्वोच्च प्राधान्य राहील. आचारसंहितेचे उल्लंघन झाल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी केले.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. बैठकीस सहायक जिल्हाधिकारी अमित रंजन, उप जिल्हा निवडणूक अधिकारी निता शिंदे,महानगरपालिका उपायुक्त स्मृती पाटील, जिल्हा माहिती अधिकारी फारूख बागवान, महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी धनंजय हर्षद आदी उपस्थित होते. सद्यस्थितीत जिल्ह्यात एकूण २४२१ मतदान केंद्रे आहेत तर २७ सहाय्यकारी मतदान केंद्रे प्रस्तावित आहेत. शिराळा तालुक्यात ०३ शॅडो मतदान केंद्रे असून या ठिकाणी संपर्कासाठी आवश्यक ती सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मतदान यंत्राची प्रथमस्तरीय तपासणी पुर्ण करण्यात आली आहे. मतदान ईव्हीएम, व्हीव्हीपॅट बाबत मतदारांमध्ये जागृती व प्रात्यक्षिक दाखविण्यात आले आहे. निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी स्वीप उपक्रमाव्दारे महिला, नवमतदार आणि दिव्यांग मतदारांवर भर देवून जनजागृती करण्यात येत आहे. प्रचार व प्रसिध्दी यासाठी स्वीप मार्फत जनजागृती करण्यात येत आहे. Voter Portal, Voter Helpline -pp या ऑनलाईन पध्दतीचा वापर करून मतदार स्वत: नोंदणी करू शकतात.

निवडणूक प्रक्रियेची आणि आदर्श आचारसंहितेची सविस्तर माहिती राजकीय पक्ष तसेच अधिकाऱ्यांनी घ्यावी. आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही यादृष्टीने सर्वांनी दक्षता घेवून निवडणूक यंत्रणेला सहकार्य करावे. इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमे व सोशल मीडियावरील राजकीय जाहिरातींचे जिल्हास्तरावर गठीत केलेल्या माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समिती कडून प्रमाणिकरण करून घेणे बंधनकारक आहे. उलंघन करणाऱ्या व्यक्ती, संस्था, पक्ष व त्रयस्त यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

सांगली जिल्ह्यासाठी मुक्त व पारदर्शी निवडणुका पार पाडण्याकरीता आवश्यक असणारे मनुष्यबळ व पुरेसा बंदोबस्त मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. जिल्ह्यात निवडणूक आदर्श आचारसंहितेचे सर्वांनीच काटेकोरपणे पालन करून निवडणूक मुक्त, निर्भय व शांततामय वातावरणात पार पाडण्याची आहे. आचारसंहितेच्या उल्लंघनाबाबत मतदारांना १९५० हा टोल फ्री क्रमांकावर तसेच सीव्हिजील पवरून आचारसंहिता भंगाची तक्रार दाखल करता येणार आहे. त्यावर १०० मिनीटांच्या आत तक्रारीचे निराकरण होईल. आचारसंहितेची काटेकोर पालन करण्यासाठी जिल्हास्तरावर पुरेशा प्रमाणात पथकांची नियुक्ति करण्यात आली आहे. निवडणूक च्या लिहशव-ींश्रश प्रमाणे काम करतील. या सर्व माध्यमातून निवडणूक मुक्त, निर्भय व शांततामय वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज आहे.

### लोकसभेसाठी हे असणार विधानसभा संघ

१) मिरज २) सांगली ३) पलूस-कडेगाव ४) खानापूर ५) तासागाव-कवठेमहांकाळ व जत या विधानसभा मतदारसंघाचा समावेश असून जिल्ह्यातील २८३-इस्लामपूर व २८४-शिराळा मतदारसंघाचा समावेश ४८-हातकणंगले या लोकसभा मतदार संघात आहे. सांगली जिल्ह्यात एकूण २४ लाख २२ हजार २०० मतदारांचा समावेश आहे. दिव्यांग मतदार २० हजार ५८७, तर ८५ वर्षावरील ३९ हजार ३२३ इतके मतदार असून सैनिक मतदार ७ हजार ८३९ इतके.

### २४ तासाच्या आता बॅनर्स, झेंडे काढावे लागणार

आचारसंहिता लागू झाल्यापासून २४ तासाच्या कालावधीमध्ये शासकीय कार्यालये व आवारातील तसेच ४८ तासात सार्वजनिक ठिकाणे व आवारातील लिखाण, अनाधिकृत राजकिय जाहिराती विविध प्रकारचे पोस्टर्स, कटआऊटस, बॅनर्स, झेंडे इत्यादी त्वरीत काढून टाकावयाचे आहेत.

### अशी असणार प्रक्रिया

(१) अधिसूचना प्रसिध्दी - शुक्रवार दि. १२ एप्रिल २०२४, (२) नामनिर्देशन पत्र भरण्याची अंतिम तारीख - शुक्रवार दि. १९ एप्रिल २०२४, (३) नामनिर्देशन पत्राची छाननी - शनिवार दि. २० एप्रिल २०२४, (४) उमेदवारी अर्ज मागे घेण्याची तारीख - सोमवार दि. २२ एप्रिल २०२४, (५) मतदानाची तारीख - मंगळवार दि. ७ मे २०२४, (६) मतमोजणीची तारीख - मंगळवार दि. ४ जून २०२४, (७) निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याची अंतिम तारीख - गुरूवार दि. ६ जून २०२४

## प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या वतीने दि. २० मार्च रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले आहे. या प्लेसमेंट ड्राईव्ह मध्ये पीएनजी ज्वेलर्स या आस्थापनेवर एकूण ४८ पदे भरण्यात येणार आहेत. या पदासाठी दहावी / बारावी पास तसेच कोणत्याही शाखेची पदवी त्याचबरोबर BCS / BC- / MC- /MB- /DME - IT अशी शैक्षणिक पात्रता आवश्यक आहे.इच्छुक उमेदवारांनी जिल्हा कौशल्य केंद्र, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तळमजला, (विजयनगर) जिल्हाधिकारी कार्यालय परिसर या ठिकाणी संपर्क साधावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त जमीर करीम यांनी केले आहे.

## कलाकार, साहित्यिक मानधन योजनेबाबत अर्ज करण्याचे आवाहन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : जिल्ह्यातील राजर्षी शाहू वृद्ध कलावंत व साहित्यिक मानधन योजनेच्या लाभार्थ्यांबाबत संबंधिताची माहिती, सांस्कृतिक कार्य विभागाकडे संकलित करण्याची प्रक्रिया सुरु आहे. त्यानुसार जिल्ह्यातील इच्छुकांनी आपली माहिती संबंधित पंचायत समितीकडे त्वरित सादर करावीअन्यथा १ एप्रिल पासून त्यांना मानधनाचा लाभ मिळणार नाही.

ही माहिती सादर करताना कलाकाराने स्वतःचे अथवा वारसदाराचे नाव, पत्ता, मानधन केव्हापासून मिळत आहे? तसेच त्याचे वय, त्याचा कला प्रकार, आधार क्रमांक त्याचबरोबर संपर्क क्रमांक, आयएफसी कोडसह बँक तपशील , कलाकार अथवा वारसदाराचे एकत्रित फोटो संबंधित तालुका पंचायत समितीमध्ये तात्काळ सादर करावेत, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी केले आहे.

## स्वीप मोहिमेंतर्गत शिंदेवाडी येथे जनजागृती

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ च्या निवडणुकीमध्ये मतदान टक्का वाढावा या दृष्टीने स्वीप (डींशशाि) मोहिमेंतर्गंत आज कवठेमहांकाळ तालुक्यातील शिंदेवाडी एच या ठिकाणी मतदान विषयक जनजागृती मोहिम राबविण्यात आली. शिंदेवाडीतील शाळेत वार्षिक स्नेह संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थितांना मतदान प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

## निरक्षरांची आज परीक्षा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : केंद्र शासन पुरस्कृत उल्लास प अंतर्गत जिल्ह्यात नोंदवण्यात आलेल्या १५ वर्षावरील निरक्षरांची उद्या म्हणजेच रविवार दि १७ मार्च रोजी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये त्या त्या ठिकाणी असणाऱ्या शाळांमध्ये सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत परीक्षा होणार आहे. असाक्षर व्यक्तींसाठी पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान आदी बाबींवर ही मूल्यमापन चाचणी परीक्षा घेण्यात येणार असून या परीक्षेसाठी संबंधितांनी आपल्या नजीकच्या परीक्षा केंद्रावर संपर्क साधावा व परिक्षा द्यावी, असे आवाहन जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी (योजना) महेश धोत्रे यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

## स्वाधार योजनेस मुदतवाढ

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेतंर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांचे यापूर्वी २९ फेब्रुवारीपर्यंत अर्ज स्वीकारण्यात आले होते. तथापि या योजनेस मुदतवाढ मिळाल्याने आता विद्यार्थी ३१ मार्च पर्यंत अर्ज करू शकतील. या योजनेतंर्गत ११ / १२ वी तसेच बारावीनंतरच्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेता यावे म्हणून ४३ हजार रुपये तसेच वैद्यकीय व अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांना प्रतिवर्ष ५००० व अन्य शाखेतील विद्यार्थ्यांना २००० इतकी रक्कम शैक्षणिक साहित्यासाठी ठोक स्वरूपात विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येते. याबाबत अधिक माहितीसाठी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य - मुख्याध्यापक, अधीक्षिका / अधिक्षक, मुलीं - मुलांचे शासकीय वस्तीगृह तसेच जुना बुधगाव रोड सामाजिक न्याय भवन सांगली येथे संपर्क साधावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त समाज कल्याण जयंत चाचरकर यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

# आटपाडी शहराच्या पाणीपूरवठा योजनेसाठी ८३ कोटींचा निधी

## सुहास बाबर : अनिलभाऊंनी पाहिलेलं स्वप्न पूर्ण

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : आटपाडी नगरपंचायतीला पिण्याच्या पाणीपुरवठा योजनेसाठी नगरोत्थान योजनेतून ८३ कोटी ८२ लाख रुपये मंजूर झाले आहे. त्यामुळे आटपाडी शहराचा पाणी प्रश्न निकाल निघणार असल्याचे प्रतिपादन जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सुहास बाबर यांनी केले. आटपाडी येथील विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेमध्ये त्यांनी माहिती दिली. यावेळी जिल्हा बँकेचे संचालक तानाजीराव पाटील, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अमरसिंह देशमुख, विटा नगरपालिकेचे माजी नगरसेवक अमोल बाबर, आटपाडी बाजार समितीचे सभापती पै. संतोष पुजारी, युवा नेते दत्तात्रय पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

या नवीन पाणीपुरवठा योजनेमध्ये गळवेवस्ती, आयटीआय कॉलेज, लघु पाटबंधारे विभाग येथे प्रत्येकी एक टाकी व कोर्ट परिसरात दोन टाक्या उभारण्यात येणार आहेत. यामध्ये २८४ किलोमीटर अंतराची अंतर्गत पाईपलाईन प्रस्तावित आहेत. त्याच बरोबर १२० केडब्लूपी चे सोलर पॉवर प्लांटची निर्मिती देखील करण्यात येणार आहे. पाईपलाईन करताना रस्ते किंवा अन्य नुकसान झाल्यास त्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे.

पुढे बोलताना सुहास बाबर म्हणाले, आमदार कै. अनिलभाऊ यांनी खानापूर मतदार संघाचा चौफेर विकासाचे स्वप्न पाहिले होते. त्यांच्या पश्चात मतदारसंघात विकास कामे होतील का? असा प्रश्न कार्यकर्त्यांना पडला होता. परंतु अनिलभाऊ यांच्या नंतर ही मतदार संघामध्ये निधीची कोणतीही कमतरता येणार नसून याबाबत मतदारसंघातील कार्यकर्त्यांनी काळजी करू नये असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख साहेबराव पाटील, ॲड. धनंजय पाटील, युवसेना तालुकाप्रमुख मनोज नांगरे, बाजार समितीचे संचालक सुबराव पाटील, पिनु माळी, नाना माळी, हणमंत गळवे, जगन्नाथ लोखंडे, उत्तम बालटे, संतोष लांडगे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



**आटपाडी : येथे पाणी पुरवठा योजनेबाबत पत्रकार परिषदेमध्ये माहिती देताना सुहास बाबर, तानाजीराव पाटील, अमरसिंह देशमुख, दतात्रय पाटील (पंच) व मान्यवर**

### अमरसिंहबापूंच्या एनओसीमुळे योजना मार्गी

आटपाडी शहराला दररोज शुद्ध पाणीपुरवठा बाबत अनिलभाऊनी शासनाकडे पाठपुरावा केला होता. यासाठी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अमरसिंह देशमुख यांच्याकडून एका कामाबाबत ना हरकत प्रमाणपत्र ही आवश्यक होते. त्यांनी ते लगेच दिल्याने आज ही योजना मंजुरी झाल्याचे सुहास बाबर यांनी संगितले.

## चौंडेश्वरी पतसंस्थेकडून सुशांत चोथेचा सत्कार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : येथील चौंडेश्वरी पतसंस्थेच्या वतीने सुशांत सुनील चोथे याची वनरक्षकपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. सदरचा सत्कार हा पतसंस्थेचे प्रमुख चंद्रकांत दौंडे व चेअरमन राहुल सपाटे यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच सुशांत याचे आई-वडील यांचा ही यावेळी सन्मान करण्यात आला.

सुशांत चे वडील सुनील चोथे व्यवसायाने टेलर आहेत. तर आई अंगणवाडी कर्मचारी आहे.घरची परिस्थिती बेताची असून सुद्धा सुशांत याने जिद्दीने व कष्टाने परिस्थितीवर मात करून वनरक्षकपदी गवसणी घातल्याबद्दल त्याचे अभिनंदन होत आहे. यावेळी पतसंस्थेचे सचिव बालक डोईफोडे यांच्यासह सर्व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.



**आटपाडी : सुशांत चोथे याचा सत्कार करताना चंद्रकात दौंडे, राहुल सपाटे, सुशांतचे आई-वडील व उपस्थित मान्यवर**

## माडगूळेतील एकाला खोटा धनादेश प्रकरणी शिक्षा

माणदेश एक्सप्रेस न्युज

आटपाडी/प्रतिनिधी : डाळिंब खरेदी करून त्याबदल्यात त्या रक्कमेचा खोटा धनादेश दिल्या प्रकरणी आटपाडी तालुक्यातील माडगुळे येथील एकाला फौजदारी न्यायाधीश विनायक पाटील यांनी तीन महिने तुरुंगवास व रक्कम रु. २,३७,८००/- दंडाच्या रक्कमेची शिक्षा सुनावली.

आटपाडी येथील संतोष विठ्ठल मगर यांनी वसंत मारुती नसले रा. माडगुळे यांना डाळिंब दिले होते. त्या डाळिंब खरेदीच्या पोटी नसले यांनी मगर यांना धनादेश दिला होता. मात्र तो न वटल्याने आटपाडी न्यायालयात फौजदारी खटला दाखल केला होता. न्यायालयाने फिर्यादी व आरोपी यांचे सर्व पुरावे पाहून यातील आरोपी वसंत मारुती नसले याला तीन महिने तुरुंगवासाची व रक्कम रु. २,३७,८००/- दंडाची शिक्षा सुनावली. दंडाची रक्कम न भरलेस पुन्हा पंधरा दिवस साध्या कैदेची शिक्षा सुनावली. फिर्यादीतर्फे ॲड. चेतन व्ही. जाधव यांनी काम पाहिले.

## जाहिरात प्रसिध्दीपूर्वी एमसीएमसी समितीकडून प्रमाणिकरण करून घेणे बंधनकारक : डॉ.राजा दयानिधी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने माध्यम प्रमाणिकरण संनियंत्रण समिती (एमसीएमसी) मार्फत राजकीय पक्ष व उमेदवारांनी इलेक्ट्रॉनिक व सोशल मीडियावरून जाहिरात प्रसिध्द करण्यापूर्वी प्रमाणिकरण करून घेणे बंधनकारक असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी दिली.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने नियुक्त केलेल्या माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समितीची बैठक जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. राजा दयानिधी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी सहायक जिल्हाधिकारी अमित रंजन, उप जिल्हा निवडणूक अधिकारी निता शिंदे, जिल्हा पुरवठा अधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी २८२-सांगली विधानसभा मतदारसंघ आशिष बारकुल, मनपा उपायुक्त स्मृती पाटील, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी यासीन पटेल, सांगली आकाशवाणीचे कार्यक्रम अधिकारी श्रीनिवास जरंडीकर, ज्येष्ठ पत्रकार अशोक घोरपडे, मनपा जनसंपर्क अधिकारी धनंजय हर्षद, शंकरराव पवार तसेच समितीचे सदस्य सचिव तथा प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी फारूख बागवान उपस्थित होते.

एमसीएमसी समितीमध्ये लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने आज झालेल्या बैठकीमध्ये जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी समिती सदस्यांना संबोधित करत असताना निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे कोटकोर पालन करण्याचे निर्देश दिले.

इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमे तसेच समाजमाध्यमांमध्ये जाहिरात करताना राजकीय पक्षांनी व उमेदवारांनी पूर्वप्रमाणिकरण करून घेणे गरजेचे आहे. त्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह विहित नमुन्यातील अर्ज समितीकडे सादर करावयाचा आहे. राष्ट्रीय व राज्य स्तरावरील राजकीय पक्षांनी प्रसारण दिनांकाच्या तीन दिवस आधी तसेच, अनोंदणीकृत राजकीय पक्ष किंवा व्यक्तिगत उमेदवारांनी प्रसारण दिनांकाच्या सात दिवस आधी अर्ज सादर करायचा आहे. समितीला एखादा अर्ज योग्य वाटत नसेल तर तो नाकारण्याचा अधिकार आहे. त्यावर संबंधितांना राज्यस्तरीय समिती व सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येईल.

जाहिरात प्रमाणिकरणासाठी आल्यानंतर त्यामध्ये आक्षेपार्ह मजकूर नसावा हे पहावे. सोशल मीडियावरही संबंधितांनी लक्ष ठेवावे.पेड न्यूज या प्रकारामध्ये मोडणाऱ्या बातम्यांची छाननी करावी.राजकीय पक्ष निवडणुकांमध्ये वृत्तपत्रातील बातम्यांच्या स्वरूपात आपली जाहिरात करतात.या जाहिरातींचे दृश्य स्वरूप बातमीसारखे असले तरी प्रत्यक्षात अशा बातम्या किंमत देऊन छापून आणल्या जातात.अशा जाहिरातींवर लक्ष ठेवावे, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी यावेळी दिल्या.



**सांगली : एमसीएमसी समितीमध्ये लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने झालेल्या बैठकीमध्ये जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी समिती सदस्यांना संबोधित करताना**

*** संपादकीय ***

# म्हातारे तितुके..

पायऱ्या चढताना-उतरताना काही वेळा धडपडणारा, भाषण करताना शब्दांचे विस्मरण होणारा सहस्राचंद्रदर्शनोत्तर विद्यामान अध्यक्ष एकीकडे आणि निवडणुकीला केवळ सत्तासोपानापर्यंत पोहोचण्याची शिडी मानणारा आणि कायद्याच्या नि कर्जफेडीच्या कचाट्यातून सुटण्यासाठी(च) व्हाइट हाऊसचा आसरा शोधणारा, पत्नीच्या नावाचा उच्चार 'मर्सिडीज' असा करणारा अमृत महोत्सवोत्तर प्रतिस्पर्धी दुसरीकडे जगातील सर्वशक्तिमान लोकशाही देशाला त्यांचा सर्वशक्तिमान अध्यक्ष निवडण्यासाठी अशा दोघांपलीकडे उमेदवार सापडू नये, ही म्हटले तर शोकान्तिका, म्हटला तर विनोद. अमेरिकेच्या अध्यक्षपदासाठी दुसऱ्यांदा जो बायडेन आणि डोनाल्ड ट्रम्प या दोहोंमध्ये लढत होईल, हे काही दिवसांपूर्वीच स्पष्ट झाले होते. परवाच्या काही पक्षांतर्गत निवडणुकांपश्चात त्यावर शिक्कामोर्तब झाले. ट्रम्प (वय वर्षे ७७) आणि बायडेन (वय वर्षे ८१) हे अशा रीतीने अमेरिकेच्या इतिहासातले सर्वाधिक म्हातारे अध्यक्षीय उमेदवार ठरतात. पण दोघांचीही सत्तेची भूक उच्च कोटीची आहे आणि त्यासाठी निवडणूक लढवण्याची ऊर्जा अक्षय्य आहे. दोन्ही गुण कौतुकास्पदच. लोकशाही, अमेरिका आणि एकंदरीत मानवजातीविषयी दोहोंची मते दोन ध्रुवांवरची आहेत. पण ते महत्त्वाचे नाही. त्याहीपेक्षा दखलपात्र ठरते, दोघांनाही सध्याच्या घडीला जवळपास प्रत्येकी निम्म्या अमेरिकी मतदारांचा पाठिंबा आहे, ही बाब. साधारण अशी परिस्थिती गेल्या निवडणुकीतही दिसून आली होती. यंदा हे ध्रुवीकरण अधिक ठळक झाल्याचे आढळते. म्हणजे जो कोणी अध्यक्ष म्हणून निवडून येईल, तो अमेरिकेच्या जवळपास अर्ध्या पात्र मतदारांचा विलक्षण नावडता असेल. दोन्ही नेत्यांनी गेल्या महिना-दीड महिन्यामध्ये बहुतेक सर्व पक्षांतर्गत निवडणुका आणि मेळाव्यांमध्ये फारशा आव्हानांविना विजय मिळवला. बायडेन यांची या स्पर्धेतली दौड ट्रम्प यांच्यापेक्षाही अधिक यशस्वी ठरली. विद्यामान अध्यक्ष निवडणूक लढवण्यास इच्छुक असेल तर त्याला विरोध करणे सहसा टाळावे, या अमेरिकी राजकारणाच्या अलिखित पैलूचा फायदा बायडेन यांना झाला. तर ज्याने गत निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला जवळपास विजयाच्या काठावर नेले, त्याच्या ताकदीचा दुसरा उमेदवार नसल्यामुळे स्वत:च्या पायावर धोंडा का मारून घ्या, असा विचार रिपब्लिकन नेत्यांनी आणि पक्षसदस्यांनी ट्रम्प यांना उमेदवारी देताना केला. या घडामोडी एका अत्यंत कळीच्या मुद्द्यापाशी येऊन थांबतात. तो मुद्दा म्हणजे सक्षम, सशक्त पर्यायाचा.

सर्वप्रथम ट्रम्प यांच्याविषयी. ज्यांच्याविरोधात चार फौजदारी खटले दाखल झाले आहेत, असे ट्रम्प अमेरिकी अध्यक्षांच्या मांदियाळीतील एकमेवाद्वितीय. त्यांच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात दोन वेळा त्यांच्याविरोधात अमेरिकी काँग्रेसमध्ये महाभियोग आणला गेला. असा पराक्रम करणारेही ते एकमेव. या चार फौजदारी खटल्यांपैकी एक अतिशय गंभीर स्वरूपाचा आहे. २०२० मधील अध्यक्षीय निवडणूक निकालात हस्तक्षेप करताना, अमेरिकी काँग्रेस आणि अमेरिकी संविधानाविरोधात उठाव केल्याचा आरोप या प्रकरणात आहे. ६ जानेवारी २०२१ रोजी रिपब्लिकन टोळीवाल्यांना कॅपिटॉल इमारतीवर चाल करून जाण्यास ट्रम्प यांनी चिथावले, या आरोपाची सुनावणी येत्या काही दिवसांत सुरू होईल. परंतु ट्रम्प यांनी या खटल्यांना बगल देण्याचे विविध मार्ग शोधून काढले आहेत. लोकशाही देशांमध्ये न्यायदान प्रक्रिया नेहमीच स्वत:चा असा वेळ घेत मार्गक्रमण करते. या गतीचा फायदा ट्रम्प उठवत आहेत. कायद्यासमोर वेळकाढूपणा करण्याचे तंत्र त्यांना फार पूर्वीपासून अवगत आहे. तशात अमेरिकी न्यायव्यवस्था आणि त्यातही सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांचे 'राजकीय' असणे ट्रम्प यांच्यासारख्यांच्या पथ्यावर पडते. विशिष्ट विचारसरणीचे न्यायाधीश त्या विचारसरणीच्या अध्यक्षाला सहसा अडचणीत आणत नाहीत, हे अमेरिकी व्यवस्थेला ज्ञात होते. त्याचा असा गैरवापर ट्रम्प यांच्यासारखे घेतील, याची मात्र फारशी कल्पना बहुतांना नव्हती. कोलोरॅडो येथील सर्वोच्च न्यायालयाने संविधानाविरोधात उठाव केल्याच्या आरोपाखाली तेथील मतपत्रिकेवरून ट्रम्प यांचे नावच काढून टाकले. त्या निकालाला अमेरिकी सर्वोच्च न्यायालयाने रद्द ठरवले. कारण तेथे रिपब्लिकन न्यायाधीशांचे प्राबल्य आहे. त्याबरोबरीनेच, अमेरिकी निवडणुकीच्या प्रक्रियेत हस्तक्षेप करणे योग्य ठरणार नाही, असा पोक्त विचारही तेथील न्यायाधीश करतात. अशा परिस्थितीत निवडणूक निकाल मान्यच न झाल्यामुळे एका पराभूत अध्यक्षाने थेट अमेरिकी काँग्रेसवर हल्ला करण्यासाठी समर्थकांना चिथावले, तेव्हा त्याबद्दल अशा व्यक्तीस शासन झालेच पाहिजे हा विचार मागे पडू लागतो. अनेकांना हे अमेरिकी व्यवस्थेचे ठळक वैगुण्य वाटते. कारण संविधानाच्या रक्षणाची शपथ घेतल्यानंतर, त्याच संविधानाविरोधात उठाव करते किंवा उठावास चिथावणी देते अशा व्यक्तीस अमेरिकेतील कोणतेही प्रशासकीय पद भूषवण्यास अपात्र ठरवण्याची तरतूद तेथील कायद्यातच आहे. पण त्या मुद्द्यावर जोरकस भूमिका तेथील रिपब्लिकनबहुल सर्वोच्च न्यायालयाने अद्याप तरी घेतलेली नाही.

ट्रम्प यांनी आणखी एक मुद्दा उपस्थित करून सर्वच खटल्यांच्या बाबतीत गोंधळ आणखी वाढवून ठेवला आहे. तो आहे अध्यक्षांना मिळणाऱ्या घटनादत्त कायदेशीर संरक्षणाचा. म्हणजे आपण 'पापे' केलीच नाहीत हा त्यांचा मुद्दा नाही, त्याबद्दल पश्चात्तापाचा तर प्रश्नही नाही. पण 'पापे' केली तेव्हा अध्यक्ष होतो म्हणून कायद्याचे संरक्षण मिळाले पाहिजे, असे त्यांचे ठाम मत! त्या मताचा प्रतिवाद कायदेशीर मार्गाने करायचा तर गुंतागुंत आणखी वाढणार. त्यात वेळही जाणार. हे अचूक हेरूनच ट्रम्प यांच्या चमूने प्रचाराची आखणी केलेली आहे. त्यांना रिपब्लिकन पक्षात आव्हान देणारे रॉन डेसांटिस, निकी हॅले, विवेक रामस्वामी स्वत:ला 'ट्रम्पपेक्षा अधिक ट्रम्पवादी' सिद्ध करायला गेले नि सपशेल फसले. ट्रम्प यांचा मुद्देसूद प्रतिवाद करून त्यांच्या अनेक दाव्यांतला फोलपणा दाखवून देऊ शकेल असे नेतृत्वच रिपब्लिकन पक्षात गेल्या दहा वर्षांत उभे राहू शकले नाही. शिवाय ट्रम्प यांना त्यांच्या वकुबाप्रमाणे वागू देण्यात पक्षाचे फार नुकसान होत नाही हे कळून चुकल्यावर तर त्या दिशेने फार प्रयत्नही झालेले नाहीत.

ट्रम्प यांच्याविरोधात उभे आहेत विद्यामान अध्यक्ष जो बायडेन. अमेरिकी राजकारणात नवीन शतकात ज्या मोजक्या विचारी राजकारण्यांचा उल्लेख करता येतो ते बहुतेक डेमोक्रॅटिक पक्षातच आढळतात. बराक ओबामा यांच्या अमदानीत बायडेन दोन वेळा उपाध्यक्ष होते. क्लिंटन दाम्पत्याचाही सहवास त्यांना लाभला आहे. परंतु अमेरिकी राजकारणात गेल्या दशकाच्या मध्यावर रौद्र बनलेल्या ट्रम्प-प्रवाहाचा सामना करण्याची क्षमता त्यांच्यात कितपत आहे, हा प्रश्न उपस्थित करता येण्यासारखी परिस्थिती आहे. राजकीयदृष्ट्या बायडेन यांना ट्रम्प यांच्याइतका व्यापक पाठिंबा आहे का हा प्रश्न. अमेरिकेचे पूर्व आणि पश्चिम किनारे हे डेमोक्रॅटिक पक्षाचे प्रभावबिंदू. गौरेतर, त्यातही आफ्रिकन-अमेरिकन, मुस्लीम आणि किनारी प्रदेशात वसलेले हिस्पॅनिक, तसेच युवा नोकरदार आणि उद्योजक हा बायडेन यांचा पारंपरिक मतदार. या मतदारांस 'मेक अमेरिका ग्रेट अगेन'सारखी स्वप्ने भुरळ पाडत नाहीत. हा मतदार जागतिक आर्थिक चढउतारांप्रति संवेदनशील असतो.

# विनानुदानित शाळांना २५ टक्के आरक्षणापासून मोकळीक आणि अनुदानित शाळांवर जबाबदारी?

सरकारने नुकत्याच काढलेल्या अधिसूचनेमुळे २५ टक्के आरक्षण ठेवण्याची विनानुदानित शाळांवरची सक्ती रद्द होणार आहे. मुलांच्या निवासापासून एक किलोमीटर परिसरात शाळा असणे आवश्यक आहे, या शिक्षण हक्क कायद्यातील तरतुदीला त्यामुळे धक्का लागू शकतो. २००९ च्या शिक्षणहक्क कायद्यातील तरतुदीनुसार विनाअनुदानित शाळा, केंद्रीय शाळा, नवोदय आणि सैनिकी शाळांमधील (विनाअनुदानित शाळा) २५ टक्के जागा वंचित गटातील मुलांसाठी आरक्षित ठेवण्याची तरतूद आहे. ही तरतूद अनुदानित आणि शासकीय शाळांना लागू होत नाही.

राज्य शासनाने दिनांक ९-२-२०२४ रोजी अधिसूचना काढून २०११ च्या शिक्षणहक्क नियमांत बदल केले. त्यानुसार विनाअनुदानित शाळेपासून एक किलोमीटर परिसरात अनुदानित / शासकीय शाळा असली तर २५ टक्के आरक्षण ठेवण्याची तरतूद त्या विनाअनुदानित शाळेला लागू होणार नाही; आणि अशी विनाअनुदानित शाळा प्रतिपूर्तीला पात्र ठरणार नाही. अनुदानित आणि शासकीय शाळा प्रत्येक गावात असल्यामुळे बहुसंख्य विनाअनुदानित शाळांवरची २५ टक्के आरक्षण ठेवण्याची सक्ती रद्द होणार आहे.

मुळात, केंद्र सरकारच्या २००९ च्या कायद्यातली तरतूद राज्यसरकारच्या नियमांत बदल करून रद्द करता येईल का, हा कायदाविषयक प्रश्न आहे. दुसरे असे की मूळ कायद्यानुसार मुलांच्या निवासापासून एक किलोमीटर परिसरात शाळा असणे आवश्यक आहे. मग विनाअनुदानित आणि अनुदानित शाळांमधील अंतराचा संबंध येतो कुठे? समजा एखाद्या वंचित कुटुंबाच्या निवासापासून एक किलोमीटरवर विनाअनुदानित शाळा आणि त्यापुढे एक किलोमीटरवर अनुदानित शाळा आहे. अशा प्रसंगी विनाअनुदानित शाळेत प्रवेश मिळणार नसेल तर त्या मुलांना दोन किलोमीटर दूरच्या अनुदानित शाळेत जावे लागेल. हे कायद्याचे धडधडीत उल्लंघन ठरेल. खरे तर हा विषय खूप गुंतागुंतीचा आहे. त्याबाबत समजून घेऊया.

साधारणपणे विनाअनुदानित शाळा इंग्रजी माध्यमाच्या तर अनुदानित / शासकीय शाळा मराठी, गुजराती, हिंदी इत्यादी माध्यमाच्या असतात. २५ टक्के आरक्षणातून घेतलेला प्रवेश इंग्रजी माध्यमासाठी असतो. तिथे प्रवेश मिळाला नाही तर मोफत शिक्षणाचा एकमेव पर्याय म्हणून त्यांना अन्य माध्यमाच्या अनुदानित / शासकीय शाळेत प्रवेश घ्यावा लागेल. माध्यमाची निवड बरोबर की चूक, हे बाजूला ठेवू. पण त्यांच्या निवडीच्या स्वातंत्र्याचा कसा विचार करणार?

आता गावोगावी इंग्रजी माध्यमाच्या विनाअनुदानित शाळा सुरू झाल्या आहेत. तिथल्या अनुदानित व शासकीय शाळांचे असे म्हणणे आहे की, २५ टक्के आरक्षणामुळे आमची मुले इंग्लिश शाळेत जातात; आमचे पट कमी झाल्यामुळे




शिक्षक अतिरिक्त ठरतात; तुकड्या व शाळा बंद पडतात आणि मातृभाषेतून शिक्षण देण्याचे तत्त्व बाजूला पडते.

कायद्यानुसार २५ टक्के आरक्षणाद्वारे प्रवेश मिळालेल्या मुलांच्या खर्चाची प्रतिपूर्ती राज्य सरकारने करायची आहे. राज्य सरकार ते करत नाही. त्यामुळे, विनाअनुदानित शाळांचाही आरक्षणाच्या तरतुदीला विरोध आहे. या विरोधात तथ्य आहे, हे मान्य करावे लागेल.

समाजाच्या सर्व स्तरातील मुलांनी एकत्र शिकावे; श्रीमंत आणि गरिबांच्या शाळा वेगवेगळ्या होऊ नयेत, हा या तरतुदीमागचा मूळ हेतू. परंतु अशा रीतीने भिन्न स्तरातील मुलांना सक्तीने एकत्र शिकवताना वंचितांच्या मुलांना वागणूक कशी मिळेल, त्यांच्यासाठी ते अडचणीचे तर ठरणार नाही ना, अशा शंका सुरुवातीपासून होत्या. प्रत्यक्षात काय घडले, हा संशोधनाचा विषय आहे. असे ऐकीवात आहे की, एका संस्थेने कंटेनरचा वापर वर्गखोली म्हणून केला आहे. ते खरे असेल तर त्यात कोणत्या मुलांना बसवले असेल, हे वेगळे सांगायला नको.

आता याच्या पुढची महत्त्वाची गोष्ट. उपरोल्लेखित अधिसूचनेनंतर शासनाच्या निर्देशानुसार शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी दिनांक ६-३-२०२४ रोजी सर्व शिक्षणाधिकाऱ्यांना एक पत्र लिहून कळविले की, २०२४-२५ वर्षाची आरटीई २५ टक्के प्रक्रिया करण्यासाठी जिल्हापरिषदेच्या आणि सर्व प्राधिकरणांच्या शाळा, खाजगी अनुदानित शाळा आणि स्वयंअर्थसहाय्यित शाळांची ऑनलाईन नोंदणी १८-३-२०२४ पर्यंत करण्यात यावी.

संचालकांनी पत्रात नमूद केले आहे की, उपरोल्लेखित अधिसूचनेने बदललेल्या नियमांनुसार ही नोंदणी करायची आहे. वास्तविक तसा उल्लेख सदर अधिसूचनेत किंवा नियमांत आढळून येत नाही. मग इतका महत्त्वाचा निर्णय कोणत्या स्तरावर झाला, हे समजायला हवे. आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण न करता नियम बदलायचे, या शासनाच्या परंपरेची प्रचिती पुन्हा एकदा आली. या निर्णयाच्या बाबतीत अनेक दोष दिसून येतात. ते असे आहेत.

(१) शिक्षणहक्क कायद्यात अनुदानित व शासकीय शाळांनी वंचित गटांसाठी आरक्षण ठेवण्याची तरतूद नाही. तरीही राज्यसरकारने तशी सक्ती केली आहे. त्यामुळे या शाळांची व्यवस्थपकीय कामे विनाकारण वाढणार आहेत.

(२) विनाअनुदानित शाळांमध्ये २५ टक्क्यांतून प्रवेश न मिळालेल्या मुलांना अखेर अनुदानित व शासकीय शाळांमध्येच यावे लागणार आहे. मग पुन्हा अनुदानित व शासकीय शाळांमध्ये आरक्षण ठेवण्यामागचे प्रयोजन काय?

(३) २५ टक्के आरक्षणाचा लाभ मिळवण्यासाठी पालकांना जातीचे व उत्पन्नाचे दाखले मिळवावे लागतात. ते असलेली पुरेशी मुले मिळाली नाहीत तर अनुदानित / शासकीय शाळांमधल्या २५ टक्के आरक्षणाच्या काही जागा कायम रिक्त ठेवाव्या लागतील.

(४) अनुदानित व शासकीय शाळांमध्ये येईल त्याला प्रवेश दिला जातो. मग वंचित गटातल्या पालकांना दाखले मिळवण्यास का भाग पाडायचे? दाखले मिळवण्यासाठी काय काय करावे लागते, ते सर्वश्रुत आहे.

(५) स्वयंअर्थसहाय्यित शाळा विनाअनुदानित असतात. मग इतर विनाअनुदानित शाळांना दिलेली सवलत या शाळांना का नाही? हा भेदभाव कशासाठी?

हे सर्व करण्यामागे कायद्याने आलेल्या कर्तव्यातून विनाअनुदानित शाळांना मुक्त करून अनुदानित / शासकीय शाळांवर २५ टक्के आरक्षणाची जबाबदारी टाकायची, आणि आरटीईची पूर्तता केली, असे दाखवायचे; तसेच शिक्षणहक्क कायद्याने आलेली आर्थिक जबाबदारी काहीही करून टाळायची, हा सरकारचा हेतू असल्याचे स्पष्ट आहे. या विषयाचे अनेक पैलू आहेत. विनाअनुदानित शाळांसह सर्व शाळांवर परस्परविरोधी परिणाम या तरतुदीमुळे होत आहेत, हे मान्य. ती समस्या सोडवण्यासाठी सार्वजनिक चर्चा घडवून आणणे, त्यावर सारासार विचार करून निर्णय घेणे आवश्यक होते. परंतु नेहमीच्या पद्धतीप्रमाणे सरकारने ते यावेळीही केले नाही.

अजूनही वेळ गेलेली नाही. अधिसूचनेद्वारे २०११ च्या नियमावलीत केलेले बदल विधिमंडळाच्या पुढील सत्रात मांडावे लागतील. तोपर्यंत संबंधितांना आपले आक्षेप व सूचना शासन / विधिमंडळाचे सचिव / आपापल्या भागातील लोकप्रतिनिधींपर्यंत पोचवता येतील. विधिमंडळात निर्णय घेताना त्यांचा विचार होऊ शकेल. सरकारवर दडपण आणून योग्य निर्णय घ्यायला भाग पाडण्यासाठी नागरिकांनी किमान असे सक्रिय प्रयत्न करायला हवेत. तसेच बालवाडी आणि पहिलीतील प्रवेशाची प्रक्रिया आता सुरू झाली असल्यामुळे अनुदानित / शासकीय शाळांना लागू केलेली २५ टक्के आरक्षणाची बेकायदेशीर अट शासनाने तात्काळ मागे घेणे आवश्यक आहे. ते शासन करेल ही अपेक्षा.

# अनेक नेते, कार्यकर्ते शिंदे गटाच्या संपर्कात: संजय शिरसाट

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

छत्रपती संभाजीनगर : अनेक पक्षातील निष्ठावान पदाधिकाऱ्यांचा त्या त्या पक्षात त्यांचा कोंडमारा होत आहे. अनेक पदाधिकारी, नेते, कार्यकर्ते यांनी आमच्याशी संपर्क साधला आहे. १८ मार्चरोजी सर्व चित्र स्पष्ट होईल, असा दावा शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी आज (दि.१६) पत्रकार परिषदेत केला.

शिवसेनेच्या ठाकरे गटासह इतर पक्षांतही अनेक निष्ठावान कार्यकर्त्यांचा कोंडमारा होत आहे. नवीन आलेले पदाधिकारी, नेते हे जुन्या जाणत्या निष्ठावानांना कमी लेखत असल्याने ही धुसफूस वाढली आहे. त्यांचा पक्षात मोठ्या प्रमाणात कोंडमारा होत असल्याचे अनेकांनी आमच्याशी संपर्क साधला आहे. त्यांना आम्ही योग्य तो सन्मान देऊ शकतो, याची खात्री असल्यानेच ते आमच्याकडे येण्यास तयार आहेत. दरम्यान, कोणत्या पक्षातील कोणता पदाधिकारी, नेता येणार यासाठी तुम्हाला आणखी एक दिवस वाट पाहावी लागणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.



विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे शिंदे गटाकडून लोकसभा लढवणार अशी चर्चा सुरू आहे. यावर भाष्य करताना शिरसाट यांनी दानवे यांना त्यांच्या पक्षात अस्वस्थता जाणवत असेल. त्यांनी खुशाल यावे, याचा निर्णय आमचे पक्षप्रमुख घेतील, असे म्हणत यावर जास्त बोलण्याचे त्यांनी टाळले. दरम्यान, छत्रपती संभाजीनगरची जागा ही शिवसेनेलाच (शिंदे गट) सुटणार असून त्यासाठी चार जण इच्छुक आहेत. यातील दोघांच्या नावाबाबत अद्याप काहीच बोलणार नसल्याचे सांगत दानवेबाबत अप्रत्यक्ष संकेत दिल्याची चर्चा दिवसभर सुरू होती.

संजय राऊत स्वत:ला कडवट सैनिक असल्याचे सांगत सुटतो. परंतु, राहुल गांधींच्या सभेनिमित्त लावण्यात आलेल्या बॅनरवर साधे उद्धव ठाकरे यांचा फोटा लावलेला नाही. याचाच अर्थ राऊत उद्धव ठाकरे यांना नेता मानतच नाही. ठाकरे गटाचे आता दिवस फिरले असून त्यांच्यावर किती जण राहतील, याचीच त्यांना गॅरंटी नसल्याचा टोला त्यांनी लगावला.

# अंतराळात दिसला 'दागिन्यांचा खजिना'

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**



अमेरिकन स्पेस एजन्सी 'नासा' आपल्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर अंतराळाशी संबंधित घटना आणि नवीनतम फोटो शेअर करत असते. नासाने नुकतीच आपल्या सोशल मीडियावर 'कॉस्मिक ज्वेलरी' नावाची खगोलीय घटना शेअर केली आहे.

नासाने नेहमीप्रमाणेच आताही सोशल मीडियावर अंतराळातील एका विस्मयकारी क्षणाचे छायाचित्र टिपले आहे. नासाच्या इन्स्टाग्राम हँडलवर पोस्ट केलेला हा 'कॉस्मिक ज्वेलरी' चा फोटो हबल स्पेस टेलिस्कोपने टिपला आहे. नेकलेस नेब्युला म्हणून प्रसिद्ध असलेले हे ठिकाण पृथ्वीपासून १५ हजार प्रकाशवर्षांच्या अंतरावर आहे. फोटो पाहताच प्रथमदर्शनी एखादा दागिन्यातील हारच जणू भासत आहे. या चित्राबाबत नासाचे म्हणणे आहे की, ते सूर्यासारख्या जुन्या ताऱ्यांनी तयार केले आहे. पहिले दोन तारे एकमेकांभोवती फिरत राहिले. मग एक तारा विस्तारला आणि त्याच्या साथीदार ताऱ्याला घेरला. तथापि, लहान तारा त्याच्या साथीदार ताऱ्याभोवती फिरत राहिला.अशा प्रकारे 'नेकलेस नेब्युला' तयार झाला.

नासाचे म्हणणे आहे की, तारे आणि वायूंचे हे कॉम्बिनेशन एखाद्या गळ्यातल्या हारासारखे दिसते. १३ मार्च रोजी पोस्ट केलेल्या या फोटोला आतापर्यंत ७० हजारांहून अधिक लाईक्स मिळाले आहेत. त्यावर अनेक कमेंट्सही केल्या जात आहेत. लोक आश्चर्यचकित नजरेने या चित्राकडे पाहत आहेत.

अवकाशात अशा अनेक गोष्टी आहेत ज्या हळूहळू उजेडात येत आहेत. नासा त्यांच्यावर लक्ष ठेवून आहे. अलीकडेच, नासाच्या पर्सव्हरन्स रोव्हरने सूर्यासमोरून जाणारा लाल ग्रहाचा चंद्र 'फोबोस' कॅप्चर केला आहे. म्हणजेच मंगळावर सूर्यग्रहणाची परिस्थिती असल्याचे यातून सिद्ध झाले होते.१८७७ मध्ये अमेरिकन खगोलशास्त्रज्ञ असफ हॉल यांनी फोबोसचा शोध लावला होता.

# चिपळुणात दोन शाळकरी मुलींचे मृतदेह सापडल्याने खळबळ

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

चिपळूण; चिपळूण तालुक्यातील दसपटी विभागात कादवड येथे वैतरणा नदीलगत दोन शाळकरी मुलींचे मृतदेह आढळून आले आहेत. या घटनेने एकच खळबळ उडाली असून या मुलींचा घातपात झाला की आणखी काही याबाबत पोलीस तपास करीत आहेत. दरम्यान मृतदेह कामथे येथील उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत.

याबाबत स्थानिक ग्रामस्थांकडून मिळालेल्या माहितीनुसार सोनाली राजेंद्र निकम (वय १४) आणि मधुरा लवेश जाधव (वय १४ रा. कादवड) या मोहन विद्यालय अकले शाळेच्या इयत्ता नववीतील विद्यार्थिनी आहेत. त्यांचे मृतदेह नदी लगत सापडल्याने दसपटी विभागात एकच खळबळ उडाली आहे.

कातकरी समाजातील या गरीब कुटुंबातील मुली असून त्यांच्या मृत्यूबाबत घातपाताचा संशय व्यक्त होत आहे. आज (दि. १६) दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास कादवड वैतरणा नदीतील एका डोहाजवळ त्यांचे मृतदेह आढळून आले. यानंतर तेथील ग्रामस्थांनी शिरगाव पोलिसांना ही खबर दिली. पोलीस दाखल होताच त्यांनी तात्काळ दादर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दोन्ही मृतदेह आणले. दादर येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शवविच्छेदनासाठी दोन्ही मृतदेह कामथे येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठवले. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

# दुष्काळात तेरावा ! दूध अनुदानाचे घोडं नेमकं अडलं कुठं? बळीराजा संतप्त

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

आष्टीः राज्यात बहुतांश भागात दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली असून चाऱ्याचा प्रश्न निर्माण झालेला असताना त्यात शेतकरी जोडधंदा म्हणून दुधाकडे पाहत आहे. परंतु, दुधाचे पडलेले भाव यामुळे बळीराजा दुहेरी आर्थिक संकटात सापडला आहे. त्यात दूध उत्पादक शेतकरी अनुदानाच्या प्रतीक्षेत आहे.

राज्य शासनाने ११ जानेवारी ते १० फेब्रुवारी या एका महिन्याच्या कालावधीकरिता दुधाला प्रतिलिटर पाच रुपयांचे अनुदान जाहीर केले होते. पण अनुदान वाटपाचा कालावधी संपून गेला. तरी दूध उत्पादक शेतकरी अजूनही अनुदानापासून वंचित आहेत. त्यामुळे अनुदान कधी मिळणार, या विवंचनेत दूध उत्पादक शेतकरी आहेत.

राज्य शासनाने जाहीर केलेल्या दूध अनुदान वाटपाचा एक महिन्याचा कालावधी संपला असून, ११ फेब्रुवारीपासून परत गायीच्या दुधाचा दर ३.५ फॅटसाठी २७ रुपये झाला आहे. काही संस्थांनी दुधाचा दर २६ रुपयांपर्यंत खाली आणला आहे. त्यामुळे दूध अनुदान वाटप शेतकऱ्यांसाठी मृगजळ ठरले आहे. अजून कुठल्याच दूध संघाने शेतकऱ्यांना प्रतिलिटर पाच रुपयांचे अनुदान दिले नाही. त्यामुळे



शेतकऱ्यांचा दूध दराचा प्रश्न 'जैसे थे' च राहिला आहे.

राज्य सरकारने जाहीर केलेले अनुदान लवकर शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करा, शिवाय दुधाला नैसर्गिकरीत्या दरात वाढ मिळत नाही. तोपर्यंत दूध अनुदान वाटपाचा कालावधी वाढवा, अशी मागणी शेतकरी करीत आहेत.अगोदरच वैरण आणि पशुखाद्यावरील खर्चात मोठी वाढ झाली असल्याने दूध व्यवसाय शेतकऱ्यांना परवडत नाही. त्यामुळे अनुदान कालावधी वाढविल्याशिवाय शेतकऱ्यांचे दूध व्यवसायातील आर्थिक गणित जुळत नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

गायीच्या दूध दराचा प्रश्न मिटला नसताना, म्हशीचा दूध दरात १ फेब्रुवारीपासून एक रुपयाची घसरण झाली आहे. त्यामुळे म्हशीच्या दूध दराचा प्रश्न निर्माण झाला आहे. ऐन उन्हाळ्यात दुधाचे दर कमी होत असल्याने शेतकरी चिंताग्रस्त आहेत.

दूध अनुदान वाटपाचा कालावधी संपला आहे. नव्याने अनुदान वाटपाचा कालावधी वाढवायला हवा, असे दूध संस्थांचे मत आहे. शासनाकडून आमच्या संघाला दूध अनुदान केव्हा मिळणार आहे किंवा अनुदान वाटप कालावधी वाढेल का, याबाबत कोणत्याही सूचना आल्या नाहीत.

जोपर्यंत दुधाला नैसर्गिकरीत्या दर मिळत नाही, तोपर्यंत राज्य शासनाने दूध अनुदान वाटपाचा कालावधी वाढवायला हवा. शिवाय जाहीर केलेले अनुदान लवकरात लवकर शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करावे. नाहीतर शिवसंग्राम संघटनेच्या वतीने आंदोलन पुकारले जाईल.


शासनाने जाहीर केलेले दूध अनुदान अजून मिळाले नाही. दूध अनुदान वाटपाचा कालावधी संपल्याने २५ ते २६ रुपयाने दूध दर मिळत आहे. त्यामुळे मायबाप सरकारने लवकरात लवकर दूध अनुदान जमा करावे व दूध अनुदान वाटपाचा कालावधी वाढवावा.

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन– ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

# लोकसभा निवडणुकीसाठी किती खर्च येणार?

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

नवी दिल्लीः देशात लोकसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. लोकसभेच्या ५४३ जागांसाठी सात टप्प्यात मतदान होणार आहे.



निवडणूक आयोगाने शनिवारी पत्रकार परिषदेत याची घोषणा केली आणि संपूर्ण देशात आचारसंहिता देखील लागू झाली. लोकसभेचे पहिल्या टप्प्यातील मतदान १९ एप्रिल रोजी, दुसऱ्या टप्प्यासाठी २६ एप्रिल, तिसऱ्या टप्प्यासाठी ७ मे, चौथ्या टप्प्यासाठी १३ मे, पाचव्या टप्प्यासाठी २० मे, सहाव्या टप्प्यासाठी २५ मे आणि सातव्या आणि अखेरच्या टप्प्यासाठी १ जून रोजी मतदान होईल. महाराष्ट्रात ५ टप्प्यात मतदान होणार आहे. तर निकाल ४ जून रोजी जाहीर होतील.

जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशातील निवडणूक प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी दीड महिन्याचा कालावधी लागेल.यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च देखील केला जातो. जाणून घेऊयात याचा खर्च किती होता आणि कोण करते हा संपूर्ण खर्च...

लोकसभा निवडणुकीचा संपूर्ण खर्च केंद्र सरकारचा असतो. यात निवडणूक आयोगाचा प्रशासकीय खर्च, मतदान ओळखपत्र तयार करणे, निवडणुकीसाठीची सुरक्षितता, मतदान केंद्र तयार करणे,एतच् मशिन खरेदी, मतदारांमध्ये जागृकता करणे आदी खर्चाचा समावेश होतो.

गेल्याच महिन्यात अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी अंतरिम अर्थसंकल्प सादर केला होता. ज्यात निवडणुकीसाठीचा खर्च जो २०२३ मध्ये २ हजार १८३.७८ कोटी होता तो वाढवून २ हजार ४४२.८५ कोटी इतका करण्यात आला. यातील १ हजार कोटी रुपये लोकसभा निवडणुकीवर खर्च केले जाणार आहेत. मतदारांचे ओळख पत्र तयार करण्यासाठी ४०४.८१ कोटी रुपये, ईव्हीएमसाठी ३४.८४ कोटी, अन्य निवडणूक खर्चासाठी १,००३.२० कोटी देण्यात आले होते.

निवडणूक आयोगाला या आर्थिक वर्षात निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी ३२१.८९ कोटी रुपये देण्यात आले आहेत. यात ३०६.०६ कोटी मतदानासाठी खर्च होणार आहेत. सार्वजनिक कार्यासाठी २.०१ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. प्रशासकिय सेवेसाठी १३.८२ कोटी देण्यात आले आहेत. २०१४ साली लोकसभा निवडणुकीसाठी ३ हजार ८७० कोटी रुपये खर्च झाला होता.देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९५१-५२ साली पहिली लोकसभेची निवडणूक झाली होती. तेव्हा १०.५ कोटी इतका खर्च झाला होता. २०१४ साली ही रक्कम ३ हजार ८७०.३ कोटींवर पोहोचली. मतदारांची संख्या १७.५ कोटींवरून ९१.२ कोटी इतकी झाली. १९५७ सालची निवडणूक वगळता प्रत्येक वर्षी निवडणुकीचा खर्च वाढत गेला. २००९ साली १,११४.४ कोटी इतका खर्च झाला होता. लोकसभा निवडणुकीसाठी इतका खर्च का होतो याची अनेक कारणे आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मतदारांची वाढलेली संख्या होय. या शिवाय उमेदवार, मतदान केंद्र, मतदारसंघांची वाढलेली संख्या यामुळे हा खर्च देखील वाढत आहे. पहिल्या लोकसभा निवडणुकीत ५३ पक्ष आणि १ हजार ८७४ उमेदवार होते. २०१९ साली ही संख्या ६७३ पक्ष आणि ८ हजार ५४ उमेदवार इतकी झाली. यासाठी १०.३७ लाख मतदान केंद्राची निर्मिती करण्यात आली होती. १७व्या लोकसभेचा कालावधी १६ जून रोजी संपणार आहे. यावेळी देशात ९७ कोटी नोंदणीकृत मतदार आहेत. यासाठी १.५ कोटी मतदान अधिकारी आणि सुरक्षा कर्मचारी काम करणार आहेत. ५५ लाख एतच् मशीन आणि ४ लाख वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे.

# लोकशाहीला हुकूमशाहीपासून वाचवण्याची कदाचित ही शेवटची संधी; खरगेंचा भाजपाला टोला

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

नवीदिल्लीः निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्या आहेत. देशात सात टप्प्यांत निवडणूक होणार असून चार जूनला निकाल जाहीर होणार आहे. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार म्हणाले की, भारताच्या निवडणुकांवर संपूर्ण जगाचे लक्ष आहे. मतदारांची माहिती देताना राजीव कुमार म्हणाले की, देशात एकूण मतदारांची संख्या ९६.८ कोटी आहे. त्यापैकी ४९.७ कोटी पुरुष आणि ४७ कोटी महिला आहेत. यावेळी १.८२कोटी मतदार प्रथमच मतदान करणार आहेत. याच दरम्यान काँग्रेसने भाजपावर निशाणा साधला आहे.

लोकशाही आणि राज्यघटना यांना हुकूमशाहीपासून वाचवण्याची कदाचित ही शेवटची संधी असेल असं म्हणत खोचक टोला लगावला आहे. काँग्रेसचे नेते मल्लिकार्जुन खरगे यांनी आपल्या ट्विटर अकाऊंटवरून याबाबत ट्विट केलं आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुका भारतासाठी 'न्यायाचे दरवाजे' उघडतील.लोकशाही आणि राज्यघटना यांना हुकूमशाहीपासून वाचवण्याची कदाचित ही शेवटची संधी असेल. द्वेष, लूट, बेरोजगारी, महागाई आणि





अत्याचाराविरुद्ध आपण भारताचे लोक एकत्र लढू. हाथ बदलेगा हालात असं मल्लिकार्जुन खरगे यांनी म्हटलं आहे.

निवडणुकीच्या तयारीची माहिती देताना निवडणूक आयुक्त राजीव कुमार म्हणाले की, १.५ कोटी मतदान अधिकारी आणि सुरक्षा कर्मचारी कार्यक्षमतेने काम करतात. यावेळीही निवडणूक घेण्याची जबाबदारी याच लोकांच्या खांद्यावर असेल, असे त्यांनी सांगितले. निवडणुकीसाठी २७ एप्स आणि पोर्टल तयार करण्यात आल्याचं त्यांनी सांगितले. आचारसंहितेच्या उल्लंघनाची माहिती cVigil एपद्वारे दिली जाऊ शकते आणि तत्काळ कारवाई केली जाईल. राजीव कुमार म्हणाले की, नोंदणीकृत मतदारांची संख्या अंदाजे ९७ कोटी आहे. १०.५ लाख मतदान केंद्रे आहेत जिथे मतदान होणार आहे. ५५ लाख ईव्हीएमचा वापर केला जाईल, तर अधिकारी आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या वाहतुकीसाठी ४ लाख वाहनांचा वापर केला जाईल. यावेळी १.८ कोटी मतदार प्रथमच मतदान करणार असल्याचे त्यांनी सांगितले. २० ते २९ वयोगटातील मतदारांची संख्या १९.४७ कोटी आहे. देशात १२ राज्ये अशी आहेत जिथे महिला मतदारांची संख्या पुरुष मतदारांपेक्षा जास्त आहे.

# गुजरात टायटन्सला मोठा झटका! अपघातामुळे ३.६० कोटींचा खेळाडू स्पर्धेबाहेर

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

आयपीएल २०२४ साठी पहिल्या टप्प्यातील वेळापत्रक जाहीर झाले आहे. २२ मार्चपासून आयपीएलच्या सतराव्या हंगामाचा थरार रंगणार आहे. चेन्नई सुपर किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात सलामीचा सामना होणार आहे. आयपीएलला सुरूवात होण्याआधीच गुजरातच्या संघाच्या अडचणी वाढल्या आहेत. कर्णधार हार्दिक पांड्या दुसऱ्या संघात गेल्यानंतर आणि मोहम्मद शमी आयपीएलमधून बाहेर पडल्याने गुजरात टायटन्सला मोठा धक्का बसला आहे. अशातच गुजरातचा आणखी एक खेळाडू दुखापतीमुळे आयपीएलच्या सतराव्या हंगामातून बाहेर झाला आहे. आयपीएल २०२४ च्या लिलावात ३.६० कोटी रुपयांना विकला गेलेला रॉबिन मिंज अलीकडेच रस्ते अपघातात जखमी झाला होता. चेन्नई सुपर किंग्ज, मुंबई इंडियन्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्या फ्रँचायझींसोबत चुरस झाल्यानंतर अखेर त्याला गुजरातने खरेदी केले. मिंज स्फोटक खेळीसाठी ओळखला जातो. त्याची मूळ किंमत २० लाख रुपये होती आणि तो ३.६० कोटी रुपयांना विकला गेला. पण दुखापतीमुळे तो आगामी हंगामाला मुकणार आहे. गुजरात टायटन्सचा प्रशिक्षक आशिष नेहराने सांगितले की, रॉबिन मिंज दुखापतीतून अद्याप सावरला नाही, त्यामुळे तो आगामी हंगामासाठी उपलब्ध नसेल. त्याची कमी नक्कीच आम्हाला जाणवेल.

# 'शक्तीपीठ'साठी एक इंचही जागा जाऊ देणार नाही

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

रांगोळीः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानामुळे मी खासदार होऊ शकलो. देशामध्ये जातीपातीचे विषारी वातावरण तयार झाले आहे. लोकांमध्ये भावनिक वातावरण तयार करून शक्तिपीठ महामार्गाच्या आडून शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल भावाने धनदांडग्याच्या घशात घालण्याचे काम केले जात आहे. त्यामुळे या मार्गासाठी शेतकऱ्यांची एक इंचही जागा जाऊ देणार नाही, असे प्रतिपादन माजी खासदार राजू शेट्टी यांनी केले.

रांगोळीतील सम्राट अशोक बौद्ध विहार लोकार्पण कार्यक्रमात ते बोलत होते. श्री. शेट्टी म्हणाले, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातील एक लोकप्रतिनिधी म्हणून बौद्ध विहारासाठी माझा निधी लावता आला हे माझे भाग्य आहे. मला परत खासदारकीची संधी मिळाल्यास बौद्ध विहारासमोर पेव्हिंग ब्लॉक बसवून देणार आहे. शक्तिपीठ महामार्गासाठी बारा जिल्ह्यांतील २७ हजार एकर शेतकऱ्यांची जमीन जाणार आहे. २०१३ मध्ये केलेल्या भूमी अधिग्रहण कायद्यात २०१५ मध्ये मोदींनी बदल करण्याचा ठराव आणला होता. त्याला देशातील पहिला खासदार म्हणून मी विरोध केला होता. त्यामुळे भूमी अधिग्रहण कायद्यात बदल केला नाही; परंतु केंद्राच्या आदेशाने २०२२ मध्ये महाविकास आघाडी सरकारने या भूमी अधिग्रहण कायद्यात बदल केला. नागरिकत्व कायद्यामुळे देशातील सर्वसामान्य नागरिकांना दुय्यम दर्जा देण्याचे काम हे सरकार करीत आहे. अशा कायद्याच्या विरोधात आवाज उठवणार आहे.' वैभव कांबळे, प्रवीण शेट्टी, बापू मुल्लाणी, श्रीकांत कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. आलम नदाफ यांची वीज वितरण कंपनीच्या अभियंतापदी निवड झाल्याबद्दल त्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. ग्रामपंचायत सदस्या अर्चना मगदूम, दीपाली हुजुरे, स्वाती कांबळे, सोनाली कांबळे, भास्कर कांबळे आदी उपस्थित होते.

# महादेवी कित्तुरे 'आदर्श गृहिणी'

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

इचलकरंजीः रोटरी सेंट्रल एक्झिक्युटिव्ह प्रोबस क्लबतर्फे आदर्श गृहिणी व आदर्श एकत्र कुटुंब पुरस्कार प्रदान कार्यक्रम झाला. इनरव्हील डिस्ट्रिक्ट अध्यक्ष वैशाली लोखंडे, स्वामी समर्थ टेक्स्टाईल ग्रुपचे अध्यक्ष रवींद्र माने यांच्या हस्ते व रोटरी प्रोबस क्लब संस्थापक अध्यक्ष प्रकाश सातपुते यांच्या उपस्थितीत कार्यक्रम झाला. महादेवी लिंगराज कित्तुरे यांना 'आदर्श गृहिणी', सातगोंडा पाटील, रमेश कबाडे, बाबासाहेब पाटील व गजानन होगाडे यांना 'आदर्श एकत्र कुटुंब' पुरस्काराने गौरवले.

कुटुंब व्यवस्थेला प्रेरणा देणारे व महिलांचे सन्मान करणारे पुरस्कार देऊन भारतीय संस्कृती जपण्याचे कार्य रोटरी प्रोबसने केले आहे, असे माने यांनी सांगितले. पाश्चात्य संस्कृतीकडे न वळता एकत्र कुटुंब पद्धती जपली पाहिजे, असे मत लोखंडे यांनी व्यक्त केले. शिवसेना शहरप्रमुख भाऊसाहेब आवळे, विलास पाडळे उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. कुबेर मगदूम व अरुंधती सातपुते यांनी करून दिली. स्वागत शिवबसू खोत यांनी, सुनील कोष्टी यांनी प्रास्ताविक केले. पुरस्कारकर्त्यांची ओळख हेमल सुलतानपुरे, सुजाता कोईक, प्राजक्ता होगाडे, निर्मला मोरे, प्रमोदिनी देशमाने यांनी करून दिली. आभार विजय पवार यांनी मानले.

# कोथळीत महावितरण उपकेंद्राला टाळे

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

दानोळीः कोथळी ग्रामपंचायतीच्या सरपंचासह पदाधिकाऱ्यांनी कोथळी हद्दीत असलेल्या मंगेश्वर माळावरील वीज वितरण कंपनीच्या उपकेंद्रातील कर्मचाऱ्यांना बाहेर काढून उपकेंद्राला टाळे ठोकले. वरिष्ठ अधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चेनंतर टाळे काढले.

कोथळी-उमळवाड संयुक्त नळपाणी पुरवठ्याचे जॅकवेलवरील नळ कनेक्शनचा विद्युतपुरवठा थकित बिलामुळे अचानक पूर्वकल्पना न देता तोडला. यामुळे कोथळी व उमळवाड या दोन गावांचा नळ पाणीपुरवठा बंद झाल्याने पाण्याअभावी नागरिकांची गैरसोय झाली. सरपंच विजय खवाटे, ग्रामविकास अधिकारी राहुल नाईक, ग्रामपंचायत सदस्य भिमगोंडा बोरगावे, शरद कांबळे, आदींनी माळावरील वीज वितरण कंपनीच्या उपकेंद्रात जाऊन कर्मचाऱ्यांना बाहेर येण्यास सांगितले. त्यानंतर ग्रामपंचायतीने उपकेंद्राला टाळे ठोकले. याची कल्पना वरिष्ठ अधिकाऱ्यांना ऑपरेटरने दिली असता कोथळी उपकेंद्राचे कनिष्ठ अभियंता अनिल गांडुळे, दानोळीचे कनिष्ठ अभियंता सलीम मुजावर आणि जयसिंगपूरचे सहायक अभियंता सोलगे हे उपकेंद्राच्या बाहेर जमलेल्या ग्रामपंचायतीच्या शिष्टमंडळाशी व पोलिसपाटील किरण खंडागळे यांच्याशी चर्चा केली. चर्चेदरम्यान ठरलेल्या अटी मान्य करीत वीज वितरण कंपनीने पाणीपुरवठ्याचा विद्युतपुरवठा सुरू करण्याचा, तर ग्रामपंचायतीने टाळे काढण्याचा निर्णय झाला. चर्चेतून मार्ग निघेपर्यंत शेतीसह चार गावांचा विद्युतपुरवठा एक तास खंडित राहिला.

# शेकापच्या उमेदवाराचा पराभव करून स्वातंत्र्यसैनिक शंकरराव माने झाले कोल्हापूरचे खासदार

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : डाव्या विचारसरणीच्या खासदारांना निवडून देणाऱ्या कोल्हापूर लोकसभा मतदारसंघात १९६७ मध्ये स्वातंत्र्यसैनिक शंकरराव माने यांना काँग्रेसने उमेदवारी दिली. त्यांनी ताकदवान असलेल्या शेकापचे उमेदवार डी. एस. नार्वेकर यांचा पराभव करून काँग्रेसच्या विजयाची परंपरा पुढे सुरू ठेवली.

माने यांनी स्वातंत्र्यलढ्यात कोल्हापुरात मोठे काम केले होते. छत्रपती शिवाजी महाराज चौकात असलेला ब्रिटिश गव्हर्नर लॉर्ड विल्सनचा पुतळा त्यांच्या नेतृत्वाखाली फोडला होता. ब्रिटिशांच्या खजिन्याच्या लुटीतही ते अग्रस्थानी होते. अशा धडाकेबाज कारवाया केलेल्या माने यांना काँग्रेसने उमेदवारी देऊन योग्य माणूस निवडला होता. ती निवड कोल्हापूरकरांनीही सार्थ ठरवली होती. अपक्ष व शेतकरी कामगार पक्षाचे प्राबल्य असलेल्या या मतदारसंघात शंकरराव माने यांनी चांगली वाटचाल केली.

त्यावेळी सावंतवाडी या मतदारसंघात होती. प्राबल्य असलेल्या शेतकरी कामगार पक्षाकडून डी. एस. नार्वेकर हे उमेदवार होते, तर आर. आर. यादव हे अपक्ष उमेदवार म्हणून रिंगणात होते. लोकसभेबरोबर विधानसभा निवडणूकही झाली होती. काँग्रेसच्या शंकरराव माने यांना एक लाख ५८ हजार ३२७ मते मिळाली, तर डी. एस. नार्वेकर यांना एक लाख २५ हजार ६१७ मते मिळाली.

खासदार नंतर झाले असले तरी ते स्वातंत्र्यसैनिकांच्या गौरव समितीवर होते. त्यातून त्यांनी अनेक स्वातंत्र्यसैनिकांना पेन्शन, इतर लाभ मिळवून दिले. १९७७ मधील जनता सरकारच्या लाटेत १६५ मतांनी शेकापचे दाजिबा देसाई यांच्याकडून पराभूत झाले. ही निवडणूक अपवाद वगळता त्यानंतर १९९८ पर्यंत या मतदारसंघात काँग्रेसचे प्राबल्य राहिले.

खासदार म्हणून काम करताना त्यांनी नेहमी त्या पदाची शान जपण्याचा कटाक्ष पाळला. त्यामुळेच त्यांच्या कामकाजाचे दाखले आजही आदर्श कारभारासाठी दिले जात आहेत.

# शिक्षकेतर कर्मचारी आश्वासित प्रगती योजना मंजूर

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कागल, ता. १५ : अनेक वर्षापासून आश्वासित प्रगती योजनेच्या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर महामंडळाच्या लढ्याला यश आले. राज्यातील खासगी मान्यताप्राप्त शाळांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेला मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. ५३ कोटी ८६ लाख रुपये खर्चास शासनाने मान्यता दिली आहे.

राज्यातील खासगी मान्यताप्राप्त शाळांतील कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना लागू करावी, अशी मागणी अनेक वर्षे शिक्षकेतर महामंडळाच्या माध्यमातून शासनाकडे केली जात होती. अनेकवेळा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी संघर्षाची भूमिका घेतली. राज्य शिक्षकेतर महामंडळाने आंदोलने केली. सावंतवाडी (ता. सिंधुदुर्ग) येथे नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा शिक्षकेतर कर्मचारी संघटनांच्या महामंडळाच्या ५१ व्या राज्यव्यापी अधिवेशनातही याच प्रश्नावर चर्चा झाली. प्रश्न मार्गी लावला जाईल, असे आश्वासन शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी शिक्षकेतर महामंडळास दिले होते.

त्यानंतर राज्यातील खासगी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या मान्यताप्राप्त प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अनुदानित शाळांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. मंत्रिमंडळाच्या ११ मार्च २०२४ रोजी झालेल्या बैठकीत राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दोन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना १ जानेवारी २०२४ पासून लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचा शासन निर्णय काढण्यात आला. अनेक वर्षांपासून प्रलंबित शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मागणी अखेर मार्गी लागली. १ जानेवारी २०२४ रोजी सेवेत असलेल्या व १ जानेवारी २०२४ पूर्वी सेवेची २४ वर्षे पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष लाभ १ जानेवारी २०२४ पासून मिळणार आहे.

# महिला आणि युवा ठरविणार देशाचे 'सत्ताधीश'

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी निवड्णूक तारखांची घोषणा केली. लोकसभा निवडणूक २०२४ साठी ७ टप्प्यांत मतदान होणार आहे. या निवडणुकीत देशातील युवा वर्ग आणि महिलांचे मतदान निर्णायक भूमिका बजावणार आहेत. कारण मागील म्हणजे २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत मतदारांची संख्या ६ टक्क्यांनी वाढली आहे. जाणून घेवूया देशातील मतदारांची संख्याबाबत सविस्तर

मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी सांगितले की, देशात एकूण ९६.८८ कोटी मतदार आहेत. त्यातील पुरुष मतदार हे ४९.७ कोटी तर महिला मतदार ४७.१ कोटी आहेत. जगातील सर्वाधिक मतदार असणार्या आपल्या देशात २०१९ मध्ये एकूण मतदारांचा आकडा ८९.६ इतका होता.

देशात पुरुष मतदारांची संख्या ४९.७ कोटी आहे, तर २०१९ मध्ये ही संख्या ४६.५ कोटी होती. दुसरीकडे, महिला मतदारांची संख्या ४७.१ कोटी आहे, जी आकडेवारी मागील लोकसभा निवडणुकीत ४३.१ कोटी इतकी होती. मतदार यादीतील लिंग गुणोत्तरामध्ये सकारात्मक वाढ झाल्याचा अहवाल निवडणूक आयोगाने दिला आहे. देशाच्या लोकशाही संरचनेत महिलांची वाढती भूमिका देखील यातून सूचित होते. मतदार यादीत २.६३ कोटींहून अधिक नवीन मतदारांचा



समावेश करण्यात आला आहे. त्यापैकी १.४१ कोटी महिला मतदार आहेत तर १.२२ कोटी पुरुष मतदार आहेत. अशा प्रकारे नवीन महिला मतदारांची संख्या नवीन पुरुष मतदारांच्या तुलनेत १५% अधिक आहे.

गेल्या पाच वर्षांत (२०१९-२०२४) मतदार लिंग गुणोत्तरामध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे. लिंग गुणोत्तर २०१९ मध्ये ९२८ होते जे २०२० मध्ये ९३२ आणि २०२१ मध्ये ९३५ पर्यंत वाढले. २०२२ आणि २०२३ मध्ये ते फक्त ९४० राहिले. तर २०२४ मध्ये ते ९४८ पर्यंत वाढेल.

देशातील तरुण मतदारांची संख्या किती?

कोणत्याही लोकशाही देशात तरुणांची भूमिका खूप महत्त्वाची असते. निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, देशात १८-१९ वयोगटातील १.८५ कोटी तरुण मतदार आहेत. गेल्या वेळी हा आकडा दीड कोटी इतका होता. १८-१९ आणि २०-२९ वयोगटातील २ कोटींहून अधिक तरुण मतदारांचा मतदार यादीत समावेश करण्यात आला आहे. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी सांगितले की, शैक्षणिक संस्थांमधून तरुणांची थेट मतदान नोंदणी सुलभ करण्यासाठी मतदारसंघ स्तरावर विशेष सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी नियुक्त करण्यात आले होते.याशिवाय १७ वर्षांवरील तरुणांसाठीही आगाऊ अर्ज मागवण्यात आले आहेत. एका वर्षात तीन वेळा एकूण १०.६४ लाखांहून अधिक आगाऊ अर्ज प्राप्त झाले आहेत.

दिव्यांग मतदार किती आहेत?

सध्या देशभरात ८८.३५ लाख दिव्यांग मतदार आहेत. गेल्या लोकसभा निवडणुकीत ४५.६४ लाख मतदार होते. निवडणूक आयोगाने सांगितले की, मतदानाच्या दिवशी सुलभता आणि सर्वसमावेशकता सुनिश्चित करून दिव्यांग व्यक्तींना आधार देण्याचा स्तुत्य प्रयत्न करण्यात आला आहे.

इतर मतदार

देशभरात इतर ४८,०४४ मतदार असल्याचे निवडणूक आयोगाने म्हटले आहे. तर २०१९ मध्ये इतर मतदार ३९,६८३ होते. १,६५,७६,६५४ मतदारांची नावे मतदार यादीतून काढण्यात आली. घरोघरी पडताळणी केल्यानंतर, १,६५,७६,६५४ मयत, कायमस्वरूपी स्थलांतरित आणि डुप्लिकेट मतदारांची नावे मतदार यादीतून काढून टाकण्यात आली आहेत. यामध्ये ६७,८२,६४२ मृत मतदार, ७५,११,१२८ कायमचे हस्तांतरित/गैरहजर मतदार आणि २२,०५,६८५ डुप्लिकेट मतदारांचा समावेश आहे. येथेच: असुरक्षित आदिवासी गटांची १००% नोंदणी साध्य करण्यासाठी विशेष प्रयत्न केले गेले आहेत. यामुळे मतदार यादी आतापर्यंतची सर्वात समावेशक बनली आहे, असेही यावेळी मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी सांगितले.

सात टप्प्यांत मतदान, ४ जून रोजी निकाल

निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी आज शनिवारी (दि.१६) लोकसभा निवडणूक २०२४ च्या तारखांची घोषणा केली. लोकसभा निवडणूक २०२४ साठी ७ टप्प्यांत मतदान होईल आणि ४ जून रोजी मतमोजणी होईल. लोकसभेसाठी पहिल्या टप्प्यातील मतदान १९ एप्रिल रोजी, दुसरा टप्प्यातील मतदान २६ एप्रिल रोजी, तिसऱ्या टप्प्यातील मतदान ७ मे रोजी, चौथ्या टप्प्यातील मतदान १३ मे रोजी, पाचव्या टप्प्यातील मतदान २० मे रोजी, सहाव्या टप्प्यातील मतदान २५ मे रोजी आणि सातव्या टप्प्यातील मतदान १ जून रोजी होईल आणि मतमोजणी ४ जून होईल, असे राजीव कुमार यांनी सांगितले.

# आवळाई, शेरेवाडी, जरेमळा रस्त्यासाठी ४ कोटीचा निधी : तानाजीराव पाटील



तानाजी पाटील

माणदेश एक्सप्रेस न्यूज

आटपाडी/प्रतिनिधी : आटपाडी तालुक्यात प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून आवळाई, शेरेवाडी ते झरेमळा ६ किलोमीटर लांबीचा रस्त्यासाठी तब्बल ४ कोटी ६३ लाख रुपये मंजूर झाल्याची माहिती सांगली जिल्हा बँकेचे संचालक तानाजीराव पाटील यांनी दिली.

हा रस्ता पूर्णत्वास येण्यासाठी आवळाई, शेरेवाडीतील लोकांची रस्त्याला निधी मिळावा ही मागणी होती. तानाजीराव पाटील यांनी कै. अनिलभाऊ बाबर यांच्याकडे पाठपुरावा केला होता आणि आवळाई ते जरेमळा रस्त्याला मंजुरी मिळाली आहे. लवकरच या डांबरीकरण रस्त्याच्या कामाला सुरुवात होईल अशी माहिती तानाजीराव पाटील यांनी दिली.

# पुण्यात दुहेरी हत्याकांड

माणदेश एक्सप्रेस न्यूज

पुणे : कौटुंबिक वादातून पुण्यात दुहेरी हत्याकांडाची घटना घडली आहे. पतीने आपल्या अल्पवयीन मुलीसह पत्नीचा खून केलाचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे पतीने खून केल्यानंतर थेट पोलीस स्टेशन गाठलं आणि खून केल्याची स्वतः कबुली दिली. ही घटना आज दुपारी कात्रज्या दत्तनगर परिसरात घडली. घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी पोलिसांनी धाव घेतली असून पुढील कारवाई करण्याचे काम सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, श्वेता तळेवाले (४०) आणि शिरोली तळेवाले (१६) अशी खून झालेल्या दोघींची नावे आहेत. तर अजय तळेवाले (४५) असे खून करणाऱ्या आरोपीचे नाव आहे. तळेवाले कुटुंब हे गेले अनेक वर्षे कात्रज येथे वास्तव्यास आहे. यांच्यात नेहमी होणारा घरगुती वाद आसपासच्या लोकांना माहिती होता. मात्र आज दुपारी असाच घरगुती वाद घडला आणि पती अजय तळेवाल याने पत्नी श्वेता तळेवाले हिच्या हातावर चाकूने वार केला.

त्यानंतर पत्नी श्वेता तळेवाले आरडाओरडा करू लागली. आईचा आरडाओरडा ऐकून तिची मुलगी रूममध्ये पळत आली. दोघांचं भांडण सोडवण्यासाठी मुलगी शिरोली मध्ये पडली. या दरम्यान आरोपी अजयने उशी तोंडावर ठेवून पत्नीचा जीव घेतला. त्यानंतर मुलीलाही त्याचप्रमाणे मारून टाकलं. ही घटना घडल्यानंतर अस्वस्थ झालेला आरोपी पतीने थेट भरती विद्यापीठ पोलीस स्टेशन गाठलं. त्यानंतर खुनाची कबुली दिली. या घटनेचा पुढील तपास भरती विद्यापीठ पोलीस करत आहे.

# कारखान्यासह गोडाऊनला आग

माणदेश एक्सप्रेस न्यूज

पुणे: येवडा येथील विडी कामगार वसाहतीमधील साउंड बॉक्स बनविण्याच्या कारखान्यासह शेजारील गोडाऊनला आग लागल्याची घटना शनिवारी सकाळी सव्वासहा वाजण्याच्या सुमारास घडली. या वेळी अग्निशमक दलाच्या जवानांनी आगीवर तातडीने नियंत्रण मिळविले. या घटनेत कोणीही जखमी झाले नाही. विडी कामगार वसाहतीमध्ये एक मजल्याची इमारत आहे. त्याच्या तळमजल्यावरच साउंड बॉक्स बनविण्याचा कारखाना आहे. या कारखान्याला शनिवारी सकाळी आग लागली. थोड्याच वेळात ही आग कारखान्याशेजारील गोडाऊनमध्ये पोचल्याने गोडाऊनही जळून खाक झाले. याबाबत मध्यवर्ती अग्निशमक दलाच्या नियंत्रण कक्षात माहिती मिळताच अग्निशामक दलाच्या येरवडा, धानोरी, नायडू व लोहियानगर येथील मुख्यालयातून अग्निशामक दलाचे बंब व पाण्याचे टँकर रवाना झाले.

अग्निशामक दलाच्या जवानांनी काही वेळातच, आगीच्या ठिकाणी पाण्याचा मारा करून आगीवर नियंत्रण मिळविले. तसेच आग इतरत्र पसरू नये, यासाठी खबरदारी घेण्यात आली. दरम्यान, कारखान्यासमोर उभ्या असलेल्या तीन दुचाकी, तसेच शेजारील ट्रान्सफॉर्मरलाही आगीची झळ बसली. आगीमध्ये कोणीही जखमी झाले नाही. मात्र या घटनेत इलेक्ट्रिक साहित्य, यंत्रसामग्री, लाकडी सामान असे साहित्य जळून खाक झाले. आगीचे कारण अद्याप समजू शकले नाही. अग्निशामक दलाचे अधिकारी विजय भिलारे यांच्या मार्गदर्शनाखाली सुभाष जाधव, सोपान पवार यांच्यासह ३०-४० जवानांनी आग आटोक्यात आणण्याचे काम केले.

# शिक्षकाचे कुटूंब बाहेर गेले; भरदिवसा घर फोडून दहा लाखांवर डल्ला

माणदेश एक्सप्रेस न्यूज

सातारा : सातारा शहराजवळील खेड येथे घरात कोणी नसल्याचा फायदा घेत भरदिवसा कडी तोडून १० लाखांहून अधिक किंमतीचा ऐवज लंपास करण्यात आला. यामध्ये सोन्याचे २९ तोळे दागिने, रोख रकमेचा समावेश आहे. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात अज्ञातावर गुन्हा नोंद झाला आहे. तर पोलिसांनी विविध पातळीवर चोरट्याचा शोध सुरू केला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, याप्रकरणी बापूराव बाबूराव सोनवलर (रा. खेड, सातारा. मूळ रा. भाडळी खुर्द, ता. फलटण) यांनी तक्रार दिलेली आहे. त्यानुसार दि. १३ मार्च रोजी सकाळी साडे आकरा ते सायंकाळी साडे पाच वाजेच्या दरम्यान चोरीचा हा प्रकार घडला. तक्रारदार हे शिक्षक असून ते व त्यांच्या कुटुंबातील सर्वजण बाहेर गेले होते. यादरम्यान, अज्ञात चोरट्याने घराच्या दरवाजाची कडी तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर बेडरूममधील लाकडी कपाटाच्या ड्रावरमधील सोन्याचे २९ तोळे आणि ६ ग्रॅम वजनाचे दागिने चोरले. तसेच यावेळी चोरट्यांच्या हाती रोख रक्कमही लागली. या चोरीनंतर संशियतांनी पलायन केले. सायंकाळी आल्यानंतर घरात चोरी झाल्याचा प्रकार लक्षात आला. त्यानंतर पोलिसांत तक्रार देण्यात आली.

या घटनेत ९ लाख २९ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरीस गेला असल्याचे तक्रारीत स्पष्ट केले आहे. तरीही आजच्या भावानुसार सोन्याचा दर अधिक आहे. त्यामुळे या चोरीत १० लाखांहून अधिक रकमेचा ऐवज लंपास झाला आहे. याबाबत सातारा शहर पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा नोंद झाला आहे. पोलिस उपनिरीक्षक जाधव हे तपास करीत आहेत.

ही चोरी दिवसा झाली आहे. जवळपास कोणी नसल्याचे पाहून हा प्रकार झाल्याचे प्राथमिक तपासात समोर आलेले आहे. पोलिसांनी आता सीसीटीव्हीचे फुटेज मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. त्यामाध्यमातून चोरट्याचा शोध घेतला जात आहे. तसेच पोलिसांनी विविध पातळीवरही चोरट्याचा तपास सुरू केलेला आहे.

# आता, दिल्लीतून आदेशाची वाट पाहणार नाही

## उदयनराजे समर्थक शिवतिर्थवर आक्रमक

माणदेश एक्सप्रेस न्यूज

मुंबई - भाजपाने आगामी लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची दुसरी तर महाराष्ट्रातील उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. भाजपाच्या दुसऱ्या यादीत काही नव्या उमेदवारांना संधी देण्यात आली असून पंकजा मुंडेंनाही भाजपने लोकसभेच्या मैदानात उतरवले आहे. मात्र, २० उमेदवारांच्या महाराष्ट्रातील पहिल्या यादीत साताऱ्यातील भाजपा नेते आणि खासदार खासदार उदयनराजे भोसले यांचे नाव नसल्याने उदयनराजेंचे समर्थक आक्रमक झाले आहेत. जिल्ह्यातील अनेक भाजपा पदाधिकाऱ्यांनी आपले राजीनामेही देऊ केले आहेत.

भाजपचे लोकसभा मतदारसंघ संयोजक सुनील काटकर यांनी शुक्रवारपर्यंत वाट पाहू व त्यानंतर आपण एकमताने निर्णय घेऊ, अशी भूमिका जाहीर केली होती. त्यामुळे, कार्यकर्ते शांत झाले. पण, आज पुन्हा एकदा उदयनराजेंचे समर्थक आक्रमक झाले असून साताऱ्यातील शिवतिर्थवर



एकत्र येत त्यांनी भूमिका जाहीर केली. सातारा लोकसभा मतदारसंघासाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि भाजपमध्ये जोरदार रस्सीखेच सुरू आहे. त्यामुळे मतदारसंघ कोणाच्या वाट्याला जाणार हे निश्चित नाही. अशातच भाजपने लोकसभा उमेदवारांच्या दोन याद्या जाहीर केल्या आहेत. मात्र, त्यामध्ये सातारा लोकसभा मतदारसंघाचा उमेदवार जाहीर झालेला नाही. त्यामुळे, ही जागा भाजपाऐवजी इतर पक्षाला जाईल, अशी चर्चा साताऱ्यात होत आहे. त्यातूनच, उदयनराजे समर्थक आक्रमक झाले आहेत.

"साताऱ्याचे राजे उदयनराजे यांना भाजपाकडून अद्याप लोकसभा निवडणुकीचं तिकीट मिळालं नाही. याच, साताऱ्यातून दिल्लीला आदेश जात होते. आता, दिल्लीतून साताऱ्याला आदेश येण्याची वाट आम्ही पाहणार नाही," असे म्हणत उदयनराजेंच्या समर्थनार्थ कार्यकर्ते साताऱ्यातील शिवतिर्थवर एकत्र जमले आहेत. यावेळी, उदयनराजे भोसले यांना उमेदवारी जाहीर न झाल्याने संताप व्यक्त करत, आम्ही म्हणजेच साताऱ्यातील जनतेनं, येथील अठरा पगड जातींनं महाराजांची उमेदवारी जाहीर केली आहे. आता, एकच नारा, अब की बार, महाराष्ट्राचे हृदयात असे म्हणत साताऱ्यातील उदयनराजे समर्थक आजही आक्रमक झाल्याचं दिसून आलं.

दरम्यान, महायुतीतील जागावाटपात साताऱ्याची जागा नेमकं कोणाला जाणार हेही अद्याप निश्चित झालं नाही. मात्र, साताऱ्यातील जागेसाठी अजित पवार गट आक्रमक असून अजित पवार गटाकडून रामराजे नाईक निंबाळकर यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू आहे.

शासकीय विश्रामगृहावरही झाली बैठक

सातारा मतदारसंघ भाजपने घेऊन उदयनराजे यांना उमेदवारी द्यावी, अशी कार्यकर्त्यांची मागणी आहे. त्यामुळे दोन याद्यांनंतरही उदयनराजेंचे नाव जाहीर न झाल्याने कार्यकर्ते संतप्त झाले. त्यांनी गुरुवारी सायंकाळी साडेसातच्या सुमारास शासकीय विश्रामगृहावर एकत्र येत जोरदार घोषणाबाजी सुरू केली. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेऊन राजकारण केले जाते. पण, त्यांच्या वंशजांना उमेदवारी डावलली जाते हे आम्ही सहन करणार नाही, अशी भूमिका कार्यकर्त्यांनी घेतली.

# निवडणूक आयुक्तांचा राजकीय नेत्यांना शायरीतून टोला; सभागृहात पिकला हशा

माणदेश एक्सप्रेस न्यूज

नवी दिल्ली - लोकशाहीच्या सर्वात मोठ्या उत्सवाची म्हणजेच लोकसभा निवडणुकांची अखेर आज घोषणा झाली. देशातील १८ व्या लोकसभा निवडणुकांसाठी आज मुख्य निवडणूक आयुक्तांनी निवडणूक कार्यक्रमाची माहिती देत पत्रकारांच्या प्रश्नांनाही उत्तरे दिली. यावेळी, शेरो-शायरीतून त्यांनी अनेकांना टोला लगावला, तर मतदारांना मतदानाला आवर्जून उपस्थित राहण्याचं आवाहनही केलं. यावेळी, राजकीय पक्षाच्या नेत्यांनाही निवडणूक आयुक्तांनी मोलाचा सल्ला दिला असून वैयक्तिक टीका टीपण्णी करण्यापासून स्वतःला रोखलं पाहिजे, असे म्हणत शायराना अंदाज दाखवला. यावेळी, सभागृहातील पत्रकारांमध्येही हशा पिकल्याचं पाहायला मिळालं.

देशातील लोकसभेच्या ५४३ जागांसाठी सात टप्प्यांत मतदान होणार आहे. नुकतेच, निवडणूक आयुक्तपदी नियुक्ती झाल्यानंतर ज्ञानेश कुमार व सुखबीर सिंग संधू यांनी शुक्रवारी मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्यासमवेत लोकसभा निवडणुकांच्या तयारीचा आढावा घेतला. त्यानंतर, आज राजीव कुमार यांच्या नेतृत्वात पत्रकार परिषद घेऊन लोकसभा निवडणुकांच्या तारखांची घोषणा करण्यात आली. त्यानुसार, ही निवडणूक ७ टप्प्यात होत असून २८ मार्च रोजी पहिलं नोटीफिकेशन जारी होणार आहे. तर, १९ एप्रिल रोजी पहिल्या टप्प्यातील मतदानाला सुरुवात होईल. महाराष्ट्रात ५ टप्प्यात मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. १९ एप्रिल, २६ एप्रिल, ७ मे, १३ मे आणि २० मे २०२४ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. त्यानंतर, देशातील संपूर्ण लोकसभा निवडणुकांचा निकाल ४ जून रोजी जाहीर होईल.

निवडणूक आयुक्तांनी निवडणूक प्रकियेवर भाष्य करताना सर्वोतोपरी माहिती दिली. निष्पक्ष आणि स्वतंत्र निवडणुका होणार असून तब्बल ९७.८ कोटी मतदार या निवडणुकांसाठी मतदान करतील, अशी माहितीही त्यांनी दिली. यावेळी, निवडणूक प्रकियेत असलेल्या आव्हानांवरही त्यांनी भाष्य केलं. तर, मतदारांना मतदान प्रक्रियेत सहभागी होण्याचं आवाहन करत, राजकीय पक्षांनाही शायरीतून टोला लगावला. राजकीय पक्षांनी वैयक्तिक टीका-टीपण्णीपासून दूर रहायला हवं, असा सल्ला राजीव कुमार यांनी दिला. यावेळी, त्यांनी, बशीर बद्र यांचा एक शेरही ऐकवला.

दुश्मनी जमकर करो लेकिन ये गुंजाइश रहे,
जब कभी हम दोस्त हो जाएं तो शर्मिंदा न हों।

अशी शायरी निवडणूक आयुक्तांनी केली, त्यावर सभागृहातील पत्रकारांनी टाळ्या वाजवून दाद दिली. त्यानंतर, आजकाल राजकारणात दोस्ती आणि दुश्मनी दोन्ही लवकर लवकरच होत असल्याचं राजीव कुमार यांनी म्हटलं. त्यांच्या या विधानावर सभागृहात हशा पिकल्याचं दिसून आलं. दरम्यान, महाराष्ट्र आणि बिहारमधील राजकारण गेल्या ५ वर्षात अशारितीनेच झाल्याचं दिसून आलं आहे. त्यामुळेच, आयुक्तांनी कुठल्याही पक्षाचं नाव न घेता सर्वांनाच चिमटा काढला.

दरम्यान, राजकीय नेत्यांच्या सोशल मिडिया अकाऊंटवर निवडणूक आयोगाचं लक्ष असणार आहे. त्यावरुन, अश्लाघ्य भाषेचा वापर करण्यात आला असेल तर त्या पोस्ट हटविण्यात येतील. तसेच, टीका टीपण्णी करताना मर्यादा ओलांडली किंवा चुकीच्या बातम्या, खोटी माहिती पसरवण्याचा प्रयत्न केल्यास आयोगाकडून संबंधितांवर कारवाई केली जाईल, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले.

# ७ मे सर्वजण साथ द्या

## राजू शेट्टी मैदानात:ठाकरेंच्या भेटीनंतर ट्वीट

माणदेश एक्सप्रेस न्यूज

लोकसभा निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. महाराष्ट्रात पाच टप्प्यात मतदान होणार असून आता राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. या सर्वाच चर्चेत आला तो हातकणंगले लोकसभा मतदारसंघ. या मतदार संघात २०१९ च्या निवडणुकीत शिवसेना उद्धव ठाकरेंसोबत असलेले धैर्यशील माने विजयी झाले होते. मात्र उद्धव ठाकरे गट महाविकास आघाडीत आहे. तर धैर्यशील माने हे शिंदे गटात आहेत. त्यामुळे हातकणंगले मधील तगडी फाईट होणार आहे.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत धैर्यशील माने यांना ५ लाख ८५ हजार म्हणजे ४६.७८ टक्के मतदान मिळाले होते. तर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांना ४ लाख ८९ हजार ७३७ मतदान म्हणजे ३९ .११ टक्के मतदान झाले होते. राजू शेट्टी यांचा ९६ हजार ३९ मतांनी पराभव झाला होता.

दरम्यान आता महाविकास आघाडी राजू शेट्टी यांच्या विरोधात उमेदवार देणार नाही अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. राजू शेट्टी यांनी दोन वेळा उद्धव ठाकरे यांची मातोश्री या निवासस्थानी भेट घेतील. आज (शनिवार) देखील त्यांनी उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीनंतर राजू शेट्टी यांनी मैदानात उतरणार असल्याचे संकेत दिले आहेत.

आज लोकसभेसा निवडणूकांच्या तारखांची घोषणा झाली आहे. ७ मेला म्हणजे तिसऱ्या टप्प्यात हातकणंगले मतदार संघात निवडणूक होणार आहे. या पार्श्वभूमीवर ७ मे सर्वजण साथ द्या, असे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर राजू शेट्टी यांनी म्हटले आहे. २००९ ते २०१४ ला राजू शेट्टी सलग दोनवेळा निवडून आले होते. २००९ मध्ये त्यांनी काँग्रेसच्या निवेदीता माने यांचा पराभव केला होता. तर २०१४ मध्ये कल्लाप्पा आवाडे यांचा पराभव केला होता.

# रिलस्टार धनंजय पोवार लढवणार निवडणूक?

## शरद पवारांची घेतली भेट, डीपींना पवारांनी दिला सल्ला



माणदेश एक्सप्रेस न्यूज

इचलकरंजी : इचलकरंजीचा प्रख्यात रिलस्टार धनंजय पोवार ऊर्फ डीपी लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहे. चक्क त्याने मुंबईत राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेऊन हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीतर्फे उमेदवारीची मागणी केली.

त्यांनी या संदर्भात शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्यांशी संपर्क करण्याचा सल्ला दिला आहे. त्यानुसार खासदार संजय राऊत यांच्याशी त्यांनी संपर्क करण्याचा प्रयत्न केला. मात्र, संपर्क न झाल्यामुळे पुढील एक - दोन दिवसांत वरिष्ठ शिवसेना नेत्यांच्या भेटीगाठी घेऊन उमेदवारीची मागणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

एखाद्या रिलस्टारने थेट अशा प्रकारे उमेदवारीची मागणी करण्याचा हा पहिलाच प्रकार आहे. हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून अद्याप कोणाचीही उमेदवारी जाहीर झालेली नाही. उमेदवारीची रस्सीखेच सुरू झाली आहे. एकीकडे असे चित्र असताना काल इचलकरंजीतील रिलस्टार धनंजय पोवारने थेट सहकारी मित्रांसह मुंबईत जाऊन राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांची भेट घेतली.

या भेटीत हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून आपणास उमेदवारी मिळावी, अशी मागणी केली. दरम्यान, हा मतदारसंघ शिवसेनेकडे असल्याचे स्पष्ट करीत पवार यांनी ठाकरे गटाच्या नेत्यांशी भेटण्याचा सल्ला दिला. आपणही आवश्यक ते सहकार्य करण्याचा शब्दही त्यांनी त्याला दिला. दोन दिवसांपूर्वी त्याने उमेदवारीसाठी भेटण्यास येत असल्याचे शरद पवार यांना कळविले होते. त्यानुसार ही भेट घेतली.

# निवडणुकीत काही अडचण नको:मुरलीधर मोहोळ

माणदेश एक्सप्रेस न्यूज

पुणे : पुणे लोकसभेसाठी भाजपकडून मुरलीधर मोहोळ यांची उमेदवारी निश्चित झाल्यानंतर त्यांनी भेटीगाठींचा धडाका सुरू केला आहे. शनिवारी त्यांनी पक्षांतर्गत विरोधक असलेले तसेच पुण्याच्या उमेदवारीसाठी शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्न केलेले माजी आमदार जगदीश मुळीक यांची भेट घेतली. त्याचप्रमाणे त्यांनी राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांच्याही निवासस्थानी भेट दिली. मतदारसंघातील जातीय गणिते लक्षात घेता निवडणूक काळात नाराजीचा कुठेही फटका बसू नये, याची पुरेपूर काळजी मोहोळ घेताना दिसून येत आहेत.

कोथरूडच्या आमदार राहिलेल्या आणि नुकत्याच राज्यसभेवर वर्णी लागलेल्या मेधा कुलकर्णी आणि



मुरलीधर मोहोळ यांच्यातील संघर्षाची वेळोवेळी चर्चा झाली. तसेच पुणे लोकसभेसाठी उमेदवारी मिळविण्याकरिता मोहोळ आणि जगदीश मुळीक यांच्यात जोरदार स्पर्धा होती. दरम्यानच्या काळात मोहोळ आणि मुळीक यांच्यातील पक्षांतर्गत वादाने उचल खाल्ली. परंतु निवडणूक काळात पक्षांतर्गत मतभेद विसरून एकत्र काम करण्याच्या वरिष्ठांच्या सूचनेनुसार हा संघर्ष शमविण्याचा प्रयत्न उमेदवार असलेल्या मोहोळ यांच्याकडून सुरू आहे.

जगदीश मुळीक स्वतः लोकसभेसाठी इच्छुक असल्याचे त्यांनी सांगितले होते. त्यासोबत मुळीक यांनीतयारीही सुरू केली होती. अयोध्या राम मंदिराच्या उद्घाटनाप्रसंगी पुण्यात भव्य कार्यक्रमांचे आयोजन त्यांनी केले होते. लोकसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून मुळीक यांनी कार्यक्रमांच्या माध्यमातून मोठं शक्तीप्रदर्शन केले होते. शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनी उमेदवारीसाठी धडपड केली. महाराष्ट्रातील भाजपचे शीर्षस्थ नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेटही त्यांनी घेतली. पण केंद्रीय निवडणूक समितीने मोहोळ यांच्या नावावर शिक्कामोर्तब केल्याने मुळीक निराश झाले. अगदी कालपरवा मोहोळ यांनी महायुतीच्या नेत्यांना कसबा गणपतीला एकत्र बोलावले परंतु नाराज मुळीक यांनी दांडी मारली. त्यामुळे आजच्या मोहोळ-मुळीक भेटीला महत्व होतं.

दुसरीकडे खासदार मेधा कुलकर्णी आणि मुरलीधर मोहोळ यांच्यातील पक्षांतर्गत वाद सर्वश्रुत आहे. गेल्या १० वर्षांपासून एकाच मतदारसंघात काम करत असताना एकमेकांमध्ये मोठी स्पर्धा होती. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत उमेदवारीवरून दोघांमध्ये प्रचंड वाद झाला. कोथरूड मतदारसंघातून दोन्ही नेते इच्छुक होते. मात्र त्यावेळी मेधा कुलकर्णी यांना उमेदवारी दिली गेली होती. म्हणून मोहोळ यांना पाच वर्षे संघर्ष करावा लागला. दरम्यान मोहोळ यांनी ५ वर्ष प्रतीक्षा केल्यानंतर पुन्हा २०१९ ला मोहोळ इच्छुक होते. मात्र २०१९ ला दोघांना डावलून चंद्रकांत पाटील यांना उमेदवारी देण्यात आली. मोहोळ यांनी पुढे पुण्याचे महापौर म्हणून काम केलं. आता तर थेट त्यांना पुणे लोकसभेचे तिकिट देण्यात आले आहे.